- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, ६ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २९७ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,४९,७०० /-
- २३ कॅरेट : १,३८,३५० /-
- चांदी : २,३८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# इंजिनिअरिंगच्या विद्यार्थीनीवर दोघांचा सामूहिक अत्याचार

## गुंगीचे औषध देऊन लॉजवर नेले, नराधमांना अटक

**वृत्तसंस्था, सांगली**

महिलांवरील अत्याचाराच्या घटना काही केल्या कमी होताना दिसत नाही. त्यातच, राजधानी दिल्लीतही मुलींवरील अत्याचाराच्या घटनेवरुन संताप व्यक्त करत तरुणाई रस्त्यावर उतरल्याचं दिसून येत आहे. एकीकडे महिला अत्याचाराच्या घटनेवर कडक कारवाईचे आश्वासन दिले जात असताना, दुसरीकडे अत्याचाराच्या घटनांनी समाजमन सुन्न होत आहे. आता, इंजिनिअरिंगचे शिक्षण घेणाऱ्या २० वर्षीय विद्यार्थिनीला लॉजवर नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना सांगली जिल्ह्यातील ईश्वरपूर परिसरात उघडकीस आली आहे.

शीतपेयातून गुंगीचे औषध पाजून तिच्या इच्छेविरुद्ध दोघांनी अत्याचार केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी ईश्वरपूर पोलिसांनी दोन्ही संशयिताला अटक केली आहे. शार्दुल पाटील (वय २१, रा. रेठरेधरण, ता. वाळवा आणि सचिन पाटील (रा. ईश्वरपूर) असे संशयित आरोपींची नावे आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी मूळची सातारा जिल्ह्यातील असून, सध्या ईश्वरपूर येथे राहून इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत आहे. ईश्वरपूर पोलिसांनी दिलेली माहिती अशी, संशयितांनी तरुणीला ईश्वरपूर-कामेरी रस्त्यावरील एका लॉजवर नेले. तेथे तिला शीतपेयातून गुंगीचे औषध पाजल्याचा आरोप आहे. त्यानंतर दोघांनी तिच्या इच्छेविरुद्ध अत्याचार केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. घडलेला प्रकार कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी देत मारहाण केल्याचाही आरोप तरुणीने केला आहे. या घटनेनंतर पीडितेने ईश्वरपूर पोलिसांत तक्रार दाखल केली.






त्यानुसार संशयितांविरुद्ध सामूहिक बलात्कारासह संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत शार्दुल पाटील याला अटक केली. फरार संशयित प्रथम पाटील याचा शोध सुरू असून, घटनेमागील नेमकी पार्श्वभूमी आणि इतर बाबींचा तपास पोलीस करीत आहेत.

**लातूरमध्ये तरुणीवर वार**

लातूरमध्येही अशीच धक्कादायक घटना घडली आहे. कॉलेजमधून घरी जात असताना एका अल्पवयीन तरुणीवर तरुणाने हल्ला केला. या हल्ल्यात तरुणी गंभीर जखमी झाली असून तिच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रोहित पोहरे असे हल्लेखोराचे नाव आहे, ही घटना भाग्यनगर पोलिस स्टेशन हद्दीत घडली. तरुणी आपल्या मैत्रिणी सोबत जात असताना रोहित पोहरे याने रस्त्यावर अडवत मला तुझ्यासोबत बोलायचे आहे, तू मला का बोलत नाही म्हणून तिच्याकडे विचारणा केली.

त्यानंतर आपल्याजवळी खंजिराने तिच्यावर हल्ला केला, जमावाने तत्काळ मध्यस्ती करत तरुणीला रुग्णालयात दाखल केले आणि त्यानंतर आरोपी रोहित याला चोप दिला. तसेच, भाग्यनगर पोलिसांना घटनेची माहिती देत पोलिसांचा ताब्यात दिले, सध्या तरुणीची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**थोडक्यात**

## उपवासाचे पदार्थ महागले

**नाशिक** : नवरात्रोत्सव अवघ्या आठवड्यावर आला असताना भगर प्रथमच २२० रुपयांवर पोहोचली असून गत वर्षापेक्षा ८० ते १०० रुपयांनी दर जास्त आहे. तर शेंगदाणा तेलाच्या दरातही ४० रुपयांची वाढ नोंदविण्यात आली आहे. यंदा पावसाचे प्रमाण कमी होते. त्याचा फटका उपवासाच्या पदार्थांना बसला असल्याची माहिती बाजारातील तज्ज्ञांनी दिली. उपवासासाठी वेगवेगळे फराळाचे पदार्थ आणि फळांचा आहार केला जातो. मागणी वाढल्यामुळे व्यापाऱ्यांनी दरवाढ केली आहे. रेडिमेड फराळाच्या पदार्थांवर १५ ते २० टक्क्यांपर्यंत भाववाढ झाली आहे. नवरात्रोत्सवात अनेक भाविक नऊ दिवसांचे उपवास करतात. त्यामुळे फराळाच्या पदार्थांना मागणी ३० ते ४० टक्के वाढते.

मागील दोन महिन्यांपूर्वी १२० रुपये किलो असलेली तूरडाळ आता १६० रुपयांवर गेली आहे. हरभरा डाळही ८० रुपयांवरून १०० रुपये किलो झाली आहे. हरभऱ्याच्या दरातही किलोमागे १० रुपयांची वाढ होऊन तो ८० रुपयांवर पोहोचला आहे. मसूर, मटकी, वाटाणा, मूग या कडधान्यांच्या दरातही किलोमागे तीन ते चार रुपयांची वाढ झाली आहे.

**तूरडाळ ४०, हरभरा डाळ २० रुपयांनी महाग**

महागाईच्या झळांनी सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असतानाच आता ऐन सणासुदीत उपवासाच्या पदार्थांसोबतच सर्वच डाळी, तांदूळ आणि गव्हाच्या दरात वाढ झाल्याने गृहिणींचे स्वयंपाकघरातील बजेट कोलमडले आहे. पूर्वी ४८ ते ६० रुपये किलो असलेला तांदूळ आता ५५ ते ६५ रुपये किलोवर पोहोचला आहे. तूरडाळीच्या ठोक दरातही वाढ झाली आहे.

## हिंगोलीत फटाक्याच्या गोदामाला भीषण आग, ३ ठार, १० ते १२ जखमी



**वृत्तसंस्था, हिंगोली**

शहरातील मारवाडी गल्लीत फटाक्याच्या गोदामाला भीषण आग लागल्याची घटना घडली. फटाक्याचे गोदाम असल्याने दारुगोळ्याचा स्फोट होऊन आगीने काही क्षणातच रौद्ररूप धारण केलं. या आगीत दोन जणांचा होरपळून मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे, तसेच १० ते १२ जण जखमी झाले आहेत. आगीबाबत माहिती मिळताच, आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू होते. मात्र, आग विझवण्यासाठी गेलेल्या अग्निशमन दलाच्या गाडीलाच आग लागल्याचंही पाहायला मिळालं.

शहरातील मारवाडी गल्ली म्हणजेच रहिवासी भागात इतक्या मोठ्या प्रमाणात फटाके ठेवल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली असून, आगीमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. या आगीमुळे मोठ्या प्रमाणात फटाके फुटत आहेत, त्यामुळे आग विझवण्यासाठी अडथळा निर्माण होत आहे. आग नेमकी कशामुळे लागली? या आगीत किती नुकसान झालं? याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. दरम्यान, घटनास्थळी अग्निशमन दलाकडून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू आहेत. मात्र, या आगीच्या घटनेत ३ जणांचा होरपळून मृत्यू झाला आहेत तर १०-१२ जण जखमी झाले आहेत जखमींना हिंगोलीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

तर, मृत्यू झालेल्यांचे मृतदेह देखील रुग्णालयात आणण्यात आले आहेत. या घटनेनं परिसरात खळबळ उडाली असून प्रशासन खडबडून जागे झाल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, या दुर्घटनेत हिंगोली शहरातील ३ घरात आग लागली असून आगीत दोन जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे, तर १०-१२ जण गंभीर जखमी असल्याची माहिती आहे. घरात फटाके असल्याने फटाक्यांना आधी आग लागली, त्यानंतर घरात आग भडकत केली.

फटाक्यामुळे आग विझवायला अडथळा झाला होता, काहीच क्षणात आगीने रौद्ररूप धारण केले. फटाक्यांना नेमकं आग कशामुळे लागली हे अद्याप अस्पष्ट आहे.

## एमपीएससीवर कारवाईचा मार्ग मोकळा

**वृत्तसंस्था, मुंबई**

एमपीएससी आयोगाचे माजी आणि विद्यमान अध्यक्ष, तसेच सदस्यांविरोधात संविधानाच्या कलम ३१७ नुसार कारवाई करण्यासाठी एक विशेष समिती गठीत करण्याची शिफारस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांच्याकडे केली आहे.

उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करून तीन महिन्यांत अहवाल मागवावा आणि त्यातील निष्कर्षांच्या आधारे पुढील कठोर कारवाई करावी, अशी विनंती देवेंद्र फडणवीस यांनी या शिफारशीद्वारे केली आहे. मुख्यमंत्र्यांच्या या मोठ्या निर्णयानंतर आता एमपीएससी आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्यांच्या अडचणी वाढण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.



गेल्या काही दिवसांपासून एमपीएससीकडून घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षांमध्ये सातत्याने घोळ सुरू असल्याच्या तक्रारी येत आहेत. यामुळे राज्यातील वातावरण चांगलेच तापले असून पुण्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांचे मोठे आंदोलन सुरू आहे. संतप्त विद्यार्थ्यांकडून एमपीएससी आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी केली जात असून विरोधी पक्षांनीही या आंदोलनाला आपला जाहीर पाठिंबा दर्शवला आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी उचललेले हे पाऊल आंदोलकांसाठी एक मोठे यश मानले जात आहे.

या सर्व वाढत्या दबावाच्या आणि आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर आता राज्य सरकारकडून कारवाईसाठी मोठे पाऊल उचलण्याची तयारी सुरू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यपालांना समिती गठीत करण्याची शिफारस केल्याने, एमपीएससी परीक्षांमधील अनियमिततेच्या प्रकरणाला आता एक नवे आणि निर्णायक वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## मोदी मंत्रिमंडळात मोठ्या फेरबदलाचे वारे, दोन बड्या मंत्र्यांची गच्छंती निश्चित

**वृत्तसंस्था, मुंबई**

केंद्र सरकारमधील मोदी मंत्रिमंडळात लवकरच मोठ्या फेरबदलाचे जोरदार वारे वाहू लागले आहेत. भारतीय जनता पक्षाने उत्तर प्रदेशातील राज्यसभा निवडणुकीसाठी आपल्या ८ उमेदवारांची घोषणा केली आहे. मात्र, या यादीतून केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी आणि केंद्रीय राज्यमंत्री बी. एल. वर्मा या दोन वजनदार मंत्र्यांची नावे गायब असल्याने राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

या दोन्ही बड्या नेत्यांचा राज्यसभा कार्यकाळ २५ नोव्हेंबर २०२६ रोजी संपत आहे. पुनर्नियोजन न झाल्याने या दोन मंत्र्यांची गच्छंती जवळपास निश्चित मानली जात असून रिक्त होणाऱ्या जागांवर कोणाची वर्णी लागणार? खासदार श्रीकांत शिंदे यांना केंद्रीय मंत्रिमंडळात लॉटरी लागणार का? याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. शासकीय नियमांनुसार, कोणत्याही मंत्र्याला पदावर राहण्यासाठी संसदेच्या कोणत्याही एका सभागृहाचे सदस्य असणे अनिवार्य असते. हरदीपसिंग पुरी यांना सर्वप्रथम जानेवारी २०१८ मध्ये उत्तर प्रदेशातून राज्यसभेत पाठवण्यात आले होते. त्यानंतर नोव्हेंबर २०२० मध्ये ते पुन्हा बिनविरोध निवडून आले आणि २०२४ मध्ये त्यांच्याकडे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. मात्र, आता भाजपच्या नव्या यादीत नाव नसल्याने पुढील ६ महिन्यांच्या आत त्यांना पुन्हा राज्यसभेवर आणावे लागेल किंवा आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागेल. यामुळे पुरी यांच्या राजीनाम्याची उलटी गिनती सुरू झाल्याची चर्चा दिल्लीच्या वर्तुळात रंगली आहे.

## साखर-सुंठ

**उमेदवारी मिळाली की साहेबांच्या चरणी नतमस्तक होतो,**
**तिकीट मिळाले की पक्षनिष्ठेचा झेंडा अभिमानाने मिरवतो.**

**डावलले की मात्र अचानक पक्षच चुकीचा ठरतो,**
**बंडखोरीचा झेंडा घेऊन स्वाभिमानाचा मुखवटा चढतो.**

**कालपर्यंत ज्यांना साहेब म्हणत होता, त्यांनाच आज दोष देतो,**
**पक्षाच्या निष्ठेची सारी शपथ क्षणात विसरून जातो.**

**स्वार्थ साधला की निष्ठावंत, डावलले की बंडखोर होतो,**
**यालाच तर भाऊ... राजकारण म्हणतो!**

**- तुमचा पंढरी**

आपले साहित्य, लेख, कविता, कथा, चारोळी,
sinhvanivrutta@gmail.com
या मेलआयडीवर पाठवा

## नागपूर पदवीधर मतदारसंघात भाजपला बंडखोरांचे आव्हान

### अनिल सोले, रमण सेनाड यांचे उमेदवारी अर्ज दाखल, बंडखोरांची समजूत काढण्याची पक्षाची धडपड, अभिजित वंजारींचाही प्रचाराला वेग

**दै. सिंहवाणी वृत्त विशेष**

**नागपूर** : नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीचे राजकीय चित्र दिवसेंदिवस रंगतदार होत असून, भाजपसमोर पक्षांतर्गत बंडखोरीचे आव्हान उभे राहिले आहे. भाजपने सुधाकर कोहळे यांना अधिकृत उमेदवारी दिल्यानंतर माजी आमदार प्रा. अनिल सोले आणि रमण सेनाड यांनीही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची भूमिका घेतली आहे. प्रा. अनिल सोले यांनी पक्षाच्या वरिष्ठांना आपण निवडणूक लढविण्याच्या निर्णयाची पूर्वकल्पना दिली होती, असे स्पष्ट केले आहे. तर रमण सेनाड यांनीही कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे निवडणुकीच्या रिंगणात उतरत असल्याचे सांगितले आहे. सेनाड यांनी आपण दीर्घकाळ संघ परिवार आणि भाजपमध्ये काम केल्याचा उल्लेख केला आहे.

दरम्यान, पदवीधर मतदारसंघातील सुमारे १२ हजार मतदार आपल्या संपर्कात असल्याचा दावा सेनाड यांनी केल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे त्यांच्या उमेदवारीचा निवडणुकीतील समीकरणांवर किती परिणाम होतो, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.





भाजपने सुधाकर कोहळे यांना अधिकृत उमेदवार केल्यानंतर पक्षातील नाराजी दूर करण्यासाठी वरिष्ठ पातळीवरून प्रयत्न सुरू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बंडखोरांशी चर्चा करून त्यांची समजूत काढण्याचे आवाहन केले आहे. कोहळे यांनीही अनिल सोले हे आपले राजकीय गुरु असल्याचे सांगत त्यांनी आपल्याविरोधात बंडखोरी करू नये, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

दुसरीकडे, काँग्रेसचे विद्यमान आमदार अभिजित वंजारी यांनीही प्रचाराला वेग दिला असून मतदारांच्या भेटीगाठी सुरू केल्या आहेत. काँग्रेसने वंजारी यांच्यावर पुन्हा विश्वास दाखवला असून त्यांनी उमेदवारी अर्जही दाखल केला आहे. अर्ज दाखल करताना काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांची उपस्थिती होती.

त्यामुळे एकीकडे भाजपचे अधिकृत उमेदवार सुधाकर कोहळे, तर दुसरीकडे पक्षातूनच स्वतंत्रपणे मैदानात उतरलेले अनिल सोले आणि रमण सेनाड, तसेच काँग्रेसचे अभिजित वंजारी अशी बहुरंगी लढत आकार घेत आहे.

बंडखोरांची समजूत काढण्यात भाजपला यश येते का, सोले व सेनाड आपली उमेदवारी कायम ठेवतात का आणि या घडामोडींमुळे मतांचे विभाजन कोणत्या पद्धतीने होते, याकडे आता संपूर्ण नागपूर विभागाचे लक्ष लागले आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ९ ऑक्टोबर असून त्यानंतरच निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.

संपादकीय लेखणीतून...

## भारतीय राज्यघटना नागरिकांच्या दोन श्रेणी ठरवत नाही!

लाखो भारतीय नागरिकांचा मताधिकार हिरावून घेणारी कोणतीही प्रक्रिया मुळातच मनमानी आणि घटनात्मक व्यवस्थेला नाकारणारी असते. केवळ प्रतिआरोप करून अशा प्रक्रियेचे समर्थन करता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांनी म्हटले आहे. हैदराबाद येथील 'नाल्सर युनिव्हर्सिटी ऑफ लॉ'मधील कार्यक्रमात बोलताना ते म्हणाले, भारतीय राज्यघटना नागरिकांच्या दोन श्रेणी ठरवत नाही. एक श्रेणी मतदानाचा अधिकार असलेले नागरिक आणि दुसरी श्रेणी मतदानाचा अधिकार नसलेले नागरिक. ज्या प्रक्रियेमुळे भारतीय नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर मताधिकार काढून घेतला जातो आणि त्यांना मतदानाचा अधिकार नसलेले नागरिक बनवले जाते ती प्रक्रिया भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२६ आणि १४ चे उल्लंघन ठरेल.

भुयान म्हणाले, जर एखाद्या प्रक्रियेमुळे लाखो भारतीय नागरिकांचा मताधिकार हिरावला जात असेल आणि त्यांना स्वतःच्याच देशात मतदानाचा अधिकार नसलेल्या नागरिकांच्या म्हणजेच दुय्यम दर्जाच्या नागरिकांच्या स्वरूपात पाहिले जात असेल तर अशी प्रक्रिया मुळतः मनमानी आहे. कितीही प्रतिवाद केला तरी त्याचे समर्थन करता येणार नाही, अशी प्रक्रिया थेट राज्यघटनेच्या मर्मावर घाव घालते. मी इतकेच म्हणेन की, भारतीय राज्यघटनेच्या स्वीकारलेल्या घटनात्मक व्यवस्थेला हा सरळ सरळ नकार आहे. सध्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेवरून जो अभूतपूर्व वाद निर्माण झाला आहे त्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांनी महत्त्वपूर्ण भाष्य केले आहे. कोट्यवधी नागरिकांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवणारी कोणतीही प्रक्रिया मूलभूतपणे मनमानी आणि घटनात्मक व्यवस्थेचे उल्लंघन करणारी आहे, असे परखड मत न्या. भुयान यांनी व्यक्त केले.

एखाद्या प्रक्रियेमुळे लाखो भारतीय नागरिक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहत असतील आणि त्यांना स्वतःच्याच देशात 'दुय्यम दर्जाचे नागरिक'(मतदानाचा अधिकार नसलेले नागरिक) बनावे लागत असेल तर अशी प्रक्रिया मूलभूतपणे मनमानी असते. अन्य गोष्टींचा दाखल देऊन या प्रक्रियेचे समर्थन करता येणार नाही. ही प्रक्रिया थेट संविधानाच्या मूळ गाभ्यावरच आघात करते. ही प्रक्रिया म्हणजे भारताच्या संविधानांतर्गत आपण स्वीकारलेल्या घटनात्मक व्यवस्थेला नाकारण्यासारखे कृत्य आहे. देशाची राज्यघटना नागरिकांचे मतदानाच्या अधिकारावर आधारित वेगवेगळे वर्ग मानत नाही. राज्यघटनेत मतदानाचा अधिकार असलेले नागरिक आणि मतदानाचा अधिकार नसलेले नागरिक अशी तरतूद नाही.

जी प्रक्रिया नागरिकांना मतदानापासून वंचित ठेवत त्यांना अधिकार नसलेले नागरिक बनवते ती प्रक्रिया राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२६ आणि १४ चे उल्लंघन करणारी ठरेल. कोणतीही संस्था नागरिकांना मतदानापासून वंचित ठेऊ शकत नाही आणि कोणतेही न्यायालय याला मान्यता देऊ शकत नाही. राज्यघटनेपेक्षा कोणीही मोठे नाही. मतदानाचा अधिकार हा राज्यघटनेच्या मूलभूत संरचनेचा एक भाग आहे. सर्वोच्च न्यायालयाने अनेक निकालांमध्ये असे स्पष्ट केले आहे की, मतदान हा मूलभूत अधिकार नसून तो एक घटनात्मक अधिकार आहे. या फरकामुळे त्याचे घटनात्मक महत्त्व कमी होत नाही. भारतीय नागरिकाचा मतदान करण्याचा अधिकार हा 'मूलभूत संरचना सिद्धांता'च्या केंद्रस्थानी आहे. भारतीय नागरिकांचा मतदानाचा अधिकार हा परकीय राजवटीविरुद्धच्या भारताच्या दीर्घकालीन संघर्षाशी निगडित आहे.

हा अधिकार म्हणजे प्रचंड संघर्ष आणि त्यागातून मिळवलेल्या आपल्या स्वातंत्र्याचे प्रतीक आहे. अनुच्छेद ३२६ मध्ये कोणत्याही प्रकारे फेरफार करता येणार नाही, असेही न्या. भुयान म्हणाले. न्या. भुयान यांनी मतदानाच्या अधिकाराबाबत मांडलेल्या परखड मतांचा संदर्भ देत काँग्रेसने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर टीका केली. न्या. भुयान यांच्या टिप्पणीवरून हे स्पष्टपणे सिद्ध होते की, मुख्य निवडणूक आयुक्तांनी राज्यघटनेचे उल्लंघन केले आहे त्यामुळे त्यांना पदावर राहण्याचा कोणताही नैतिक अधिकार उरलेला नाही. भारतीय नागरिकाचा मताधिकार काढून घेणे म्हणजे त्याच्या शरीरातून आत्मा काढून घेण्यासारखे ठरेल.

## बिभीषण

रामायणातील एक पात्र म्हणजे बिभीषण. बिभीषण रावणाचा भाऊ सत्याच्या मार्गावर चालणारे. चांगले कर्म करणारे एक चांगल्या विचाराचे व्यतिमत्व. बिभीशणाला बरेच जण धोकेबाज समजतात. भावाला धोका देणारा भाऊ असे म्हटल्या जाते. परंतु ह्याचा विचार होतं नाही की कोणत्या आज्ञेचे पालन केले पाहिजे धर्म काय शिकतो. रावण कितीही बलाढ्य, महादेवा चा भक्त असला तरी, आणि त्याच्याकडे सोन्याची लंका असली तरी त्यांची किंमत शून्यच आहे कारण जिथे क्रूरता आहे. असत्याचा मार्ग आहे. अहंकारी प्रवृत्ती आहे. इतरांच्या भावनांशी खेळल्या जाणाऱ्या आशा क्रूर व्यक्ती ची साथ द्यायला हवी का? तर नाही ना. पक्त आपली बहीण, वडील, मुलगा, आणि मित्र नातं कुठलंही असो वाईट विचारला,वाईट प्रवृत्ती ला साथ दयायला नको धर्म हेच शिकवते.

" सुबह का भुला अगर शाम को पावस आये तो उसे भुला नही कहते " मगर सुबह का भुला शाम को वापस ना आया तो उसे भूल जाना ही बेहतर होता है. श्री राम, लक्षण आणि भरत शत्रुघ्न हे सर्व भाऊ संस्कारी होते सत्याच्या मार्गने चालणारे होते. चांगल्या प्रवृत्ती चे होते म्हूणन एकमेकांना धरून चालणारे होते. या विरुद्ध रावण होता म्हूणन बिघीशन ने रावणाची साथ दिली नही लंकेचा एक व्यक्ती चांगला असल्यामुळे लंका चांगली राहली. चांगली प्रवृत्ती चिरंकाळ टिकते. आणि खरब प्रवृत्ती कितीही बलाढ्य असली तरी तिचा नाश होणे निश्चित आहे.

**- कल्पना शैलेश तांबट**



# युद्ध महासत्तांचे, होरपळ सामान्य माणसाची!

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

"युद्ध महासत्तांचे, होरपळ सामान्य माणसाची!" हे आजच्या जागतिक परिस्थितीचे अत्यंत कडू आणि विदारक सत्य मांडणारे वाक्य आहे. जेव्हा दोन किंवा अधिक बलाढ्य देश (महासत्ता) आपापला अहंकार, सत्ता, भूराजकीय वर्चस्व आणि आर्थिक फायद्यासाठी एकमेकांसमोर उभे ठाकतात, तेव्हा त्याचे सर्वात भयानक परिणाम हे कोणत्याही राजकारणाशी संबंध नसलेल्या सामान्य जनतेला भोगावे लागतात.

महासत्तांच्या या लढाईत सामान्य माणसाची होरपळ होत असते. महासत्तांचे नेते वातानुकूलित खोलीत बसून युद्धाचे निर्णय घेतात, पण त्याची किंमत रस्त्यावर राहणाऱ्या सामान्य माणसाला आपल्या रक्ताने आणि अश्रूंनी चुकवावी लागते. इतिहास साक्षी आहे की, युद्धामुळे कधीच कोणाचे भले झाले नाही; जिंकणाऱ्याचेही नुकसान होते आणि हरणारा तर उद्ध्वस्त होतोच, पण या सगळ्यात सर्वात जास्त होरपळते ती फक्त आणि फक्त माणुसकी.याचे वास्तव सध्या जगात सुरू असलेल्या युद्ध सदृश्य परिस्थितीवरून येत आहे. जेव्हा आपण जागतिक परिस्थितीचे तटस्थपणे अवलोकन करतो, तेव्हा एक अत्यंत अस्वस्थ करणारे चित्र समोर उभे राहते. जगात सध्या सुरू असलेले संघर्ष केवळ सीमेवरील गोळीबारापुरते मर्यादित राहिलेले नाहीत, तर त्यांनी आता थेट सर्वसामान्यांच्या ताटातील अन्नावर घाला घातला आहे. भारताचे परराष्ट्र मंत्री सुब्रह्मण्यम जयशंकर यांनी न्यूयॉर्क येथील आशिया सोसायटीच्या व्यासपीठावरून जो अत्यंत गंभीर इशारा दिला आहे, तो जागतिक राजकारणाच्या आणि अर्थकारणाच्या दृष्टीने एक मोठा धोक्याचा कंदील आहे. युक्रेनमधील प्रदीर्घ काळ चाललेला संघर्ष आणि आता इराण व आखाती देशांमध्ये भडकलेली युद्धाची नवी ठिणगी, या २ मोठ्या संकटांमुळे जगावर एक अभूतपूर्व आणि महाभयंकर अन्नसंकट ओढवणार आहे. महासत्तांच्या या साठमारीत आणि वर्चस्वाच्या लढाईत, जगातील सर्वसामान्य माणूस आणि गरीब देश नाहक होरपळून निघत आहेत, हेच या कठोर वास्तवातून स्पष्ट होते.

शेती आणि अन्नसुरक्षा या कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा आणि अस्तित्वाचा कणा असतात. परंतु आज या दोन्ही युद्धांमुळे शेतीचा मूळ आधार असलेल्या खतांच्या पुरवठ्यावरच कुऱ्हाड कोसळली आहे. रशिया आणि पश्चिम आशिया हे जगातील खतांचे सर्वात मोठे उत्पादक आणि पुरवठादार मानले जातात. खतांच्या जागतिक बाजारपेठेवर या देशांचे मोठे वर्चस्व आहे. मात्र, आज या दोन्ही महत्त्वाच्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये युद्धाचे काळे ढग दाटले आहेत. परिणामी, खतांचे उत्पादन करणारे मोठे कारखाने, त्यांची दळणवळण व्यवस्था आणि संपूर्ण पुरवठा साखळी पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. जर जमिनीत पेरणी करण्यासाठी आणि पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असणारे खतच वेळेवर उपलब्ध नसेल, तर शेतातून धान्याचे उत्पादन कसे होणार? खतांच्या या जागतिक तुटवड्यामुळे आगामी हंगामात कृषी उत्पादनात मोठी घट होईल, ज्यामुळे जागतिक बाजारात धान्याची उपलब्धता निम्म्यावर येण्याची दाट शक्यता आहे. हे संकट केवळ १ हंगामापुरते मर्यादित नाही, तर कृषी क्षेत्राचे झालेले हे नुकसान भरून काढण्यासाठी पुढील अनेक वर्षे संघर्ष करावा लागेल.

या अन्नसंकटाचा दुसरा आणि सर्वाधिक विनाशकारी पैलू म्हणजे काळा समुद्र (ब्लॅक सी) मार्गावरील सागरी नाकेबंदी. युक्रेन आणि रशिया या देशांना जगाचे धान्याचे कोठार म्हटले जाते. जगातील अनेक देश गहू, मका आणि सूर्यफूल तेलासाठी याच देशांवर अवलंबून आहेत. या धान्याची निर्यात मुख्यत्वे काळ्या समुद्राच्या मार्गानेच होते. परंतु, युद्धामुळे हा संपूर्ण सागरी मार्ग अत्यंत असुरक्षित बनला आहे. जहाजांवर होणारे हल्ले आणि वाढलेल्या विमा दरांमुळे धान्याची वाहतूक जवळपास ठप्प झाली आहे. जेव्हा जगातील सर्वात मोठे धान्य उत्पादक देश आपली निर्यात करू शकणार नाहीत, तेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारात अन्नाचा प्रचंड तुटवडा निर्माण होईल. जेव्हा धान्याची मोठी कोठारे केवळ भूराजकीय वादामुळे कुलूपबंद राहतील, तेव्हा अन्नासाठी जगाच्या पाठीवर अक्षरशः हाहाकार माजेल आणि भुकेचा प्रश्न अधिक उग्र रूप धारण करेल.

अन्नसंकटासोबतच जगाला भेडसावणारी दुसरी मोठी समस्या म्हणजे ऊर्जा संकट आणि तेलाचे राजकारण. आज जागतिक बाजारपेठेत खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा आधीच मर्यादित आहे. अशा अत्यंत नाजूक परिस्थितीत, जेव्हा काही बलाढ्य देश इंधनाचा वापर एक राजकीय आणि सामरिक हत्यार म्हणून करू लागतात, तेव्हा परिस्थिती अधिकच हाताबाहेर जाते. परराष्ट्र मंत्र्यांनी आपल्या निवेदनात अत्यंत स्पष्टपणे नमूद केले आहे की, किमती स्थिर ठेवण्यासाठी आणि जागतिक महागाई आटोक्यात आणण्यासाठी सर्व देशांनी सामूहिक प्रयत्न करणे अपेक्षित असताना, येथे मात्र जाणीवपूर्वक इंधनाची कोंडी केली जात आहे. इंधनाचे दर वाढले की साहजिकच दळणवळण आणि वाहतूक महागते. याचा थेट परिणाम जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीवर होतो. अन्नाचा तुटवडा आणि वाहतुकीचा वाढता खर्च, या २ गोष्टी एकत्र आल्या की महागाईचा असा काही भडका उडतो, ज्यातून सर्वसामान्यांचे कंबरडे कायमचे मोडते.

या संपूर्ण जागतिक उलथापालथीत आणि शस्त्रास्त्रांच्या स्पर्धेत सर्वाधिक नुकसान कोणाचे होणार असेल, तर ते आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील विकसनशील आणि गरीब देशांचे. या देशांच्या समूहाला आंतरराष्ट्रीय पातळीवर ग्लोबल साऊथ (जागतिक दक्षिण) म्हणून ओळखले जाते. भारत हा या समूहाचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि नेतृत्व करणारा देश आहे. या गरीब आणि विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्था आधीच कर्ज, बेरोजगारी आणि विकासाच्या अनेक आव्हानांशी झुंजत आहेत. त्यात आता हे २ प्रमुख संघर्ष आणि त्यातून निर्माण होणारे अन्न व ऊर्जा संकट धडकल्यास, या देशांमध्ये केवळ महागाईच वाढणार नाही, तर गरिबी, कुपोषण आणि उपासमार अधिक उफाळून येईल. पाश्चात्य प्रगत देश कदाचित आपल्या आर्थिक ताकदीच्या जोरावर वाढीव किमती देऊन अन्नधान्य आणि तेल खरेदी करू शकतील, पण आफ्रिका किंवा आशियातील गरीब देशांकडे तो पर्याय नाही. त्यामुळे या युद्धांची सर्वात मोठी आणि भयंकर किंमत याच गरीब देशांना मोजावी लागणार आहे.

आज जगातील सर्व प्रगत आणि महासत्तावादी राष्ट्रांनी हे कटू सत्य समजून घेण्याची नितांत आवश्यकता आहे की, युद्धभूमीवर रक्त सांडून किंवा जमिनीचा एखादा तुकडा जिंकून मानवतेला अन्नाशिवाय जिवंत ठेवता येत नाही. राजकारण आणि सामरिक वर्चस्व हे मानवी जीवनापेक्षा कधीही मोठे असू शकत नाही. जर वेळीच या जागतिक पुरवठा साखळ्या पूर्ववत करण्यासाठी ठोस पावले उचलली नाहीत आणि युद्धाच्या राजकारणापेक्षा जागतिक अन्नसुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले गेले नाही, तर आगामी काळ हा मानवजातीच्या इतिहासातील अत्यंत अंधकारमय आणि कठीण काळ ठरू शकतो. भारताने दिलेला हा धोक्याचा इशारा जर जागतिक समुदायाने वेळीच गांभीर्याने घेतला नाही, तर अन्नटंचाईची आणि महागाईची ही धग प्रत्येक देशाच्या आणि प्रत्येक माणसाच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचायला अजिबात वेळ लागणार नाही.

- ९५६१५९४३०६

# दुष्काळी परिस्थिती आणि आर्थिक कोंडीत सरकार ट्रॅप, तर प्रत्येक हालचालीत जनता ट्रॅक

**सुनील शिरपुरे**
**यवतमाळ**

केंद्र आणि राज्य सरकार सुरक्षा, पारदर्शकता आणि कर आकारणी अधिक मजबूत करण्यासाठी वेगवेगळ्या स्तरांवर विविध महत्त्वाच्या गोष्टींवर हायटेक आणि रिअल-टाइम मॉनिटरिंग म्हणजेच थेट देखरेख ठेवण्यास सुरुवात करणार आहे. महाराष्ट्र सरकार दुष्काळ आणि आर्थिक संकटामुळे लाडकी बहीण योजनेसह एकूण २६ प्रमुख लोककल्याणकारी योजना आणि २५ शासकीय धोरणांवर महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक') द्वारे भारतीय व्यवस्थापन शिक्षण संस्था मुंबई (आयआयएम मुंबई) च्या सहकार्याने रिअल-टाईम मॉनिटरिंग म्हणजेच थेट देखरेख करणार आहे. याशिवाय, माहिती आणि जनसंपर्क संचालनालय (डीआयपीआर) अंतर्गत प्रसारमाध्यमं, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियावरील सर्व प्रकारच्या सकारात्मक व नकारात्मक बातम्यांचे अवलोकन करण्यासाठी राज्य सरकारने स्वतंत्र मीडिया मॉनिटरिंग सेंटरची स्थापना केली आहे. ज्याद्वारे सरकारविरोधी किंवा शासनाशी संबंधित बातम्यांवर सतत नजर ठेवली जाते. सांगायचे तात्पर्य म्हणजे सध्या सरकारचा मुख्य भर हा सरकारी योजनांचा खर्च, दुष्काळी उपाययोजना आणि सोशल मीडियावरील बातम्या ट्रॅक करण्यावर आहे.

२६ प्रमुख लोककल्याणकारी योजना आणि २५ शासकीय धोरणांवर प्रत्यक्ष नजर ठेवून १.२० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीच्या खर्चाचा मागोवा घेतला जाणार आहे. आयकर विभागाकडून बँक खात्यांमधील मोठ्या रोख (कॅश) व्यवहारांवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार असल्याने वर्षाला १० लाख रुपयांपेक्षा जास्त कॅश डिपॉझिट किंवा विथड्रॉवल झाल्यास सरकारकडून नोटीस येण्याची शक्यता आहे. ५,००० रुपयांपेक्षा जास्त मूल्याचे सर्व डिजिटल व्यवहार आणि युपीआय ट्रान्झॅक्शन्सच्या रेकॉर्डवर सरकार लक्ष ठेवल्याने डिजिटल पेमेंट ट्रॅक होणार आहे. सुरक्षितता आणि संशयास्पद खातीच्या दृष्टीकोनातून करचुकवेगिरी किंवा संशयास्पद उत्पन्न आढळल्यास अधिकृत अधिका-यांना बँक खाती, ईमेल आणि क्लाउड स्टोरेज तपासण्याची परवानगी देण्यात येणार आहे.

प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल मीडियामधील बातम्यांवर लक्ष ठेवण्यासाठी १० कोटी रुपये खर्चून 'मीडिया मॉनिटरिंग सेंटर' स्थापन केले आहे. ज्याद्वारे सरकारविरोधातील नकारात्मक बातम्या आणि चुकीच्या माहितीवर (फेक न्यूज) लक्ष ठेवले जाणार आहे. गृह मंत्रालयाने (एमएचए) सायबर गुन्हेगारी आणि बेकायदेशीर कंटेंट रोखण्यासाठी फेसबुक, इंस्टाग्राम आणि युट्युब यांसारख्या प्लॅटफॉर्मवरील लाखो संशयास्पद लिंक्स आणि खात्यांवर मॉनिटरिंग वाढवून ते ब्लॉक करण्याचे आदेश दिले जाणार आहेत. पब्लिक ट्रान्सपोर्ट ट्रॅकिंग करण्याकरीता सार्वजनिक बसेस, टॅक्सी आणि इतर प्रवासी वाहनांमध्ये 'व्हीकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाईस' आणि पॅनिक बटन अनिवार्य करण्यावर सरकार विचार करत आहे. पॅनिक बटन दाबल्यास थेट राज्य सरकारच्या मॉनिटरिंग सेंटरला अलर्ट मिळतो. तसेच दिल्ली सरकारने प्रदूषणाचे स्त्रोत शोधण्यासाठी २४ तास चालणारे 'एआय-पावर्ड इंटीग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटर' सुरू करत आहे. ज्याद्वारे कचरा जाळणे, बांधकामाची धूळ आणि रिअल-टाइम एअर क्वालिटी वर थेट नजर ठेवली जाणार आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील २६ योजना आणि २५ धोरणांचा फेरआढावा घेतला जाणार आहे. १.२० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या योजनांच्या अंमलबजावणीवर रिअल-टाइम मॉनिटरिंग केले जाणार



आहे. महाराष्ट्रातील महिलांसाठी महत्त्वाची योजना असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकडे सध्या विशेष लक्ष लागले आहे. राज्यात दुष्काळ आणि पाणी-चारा टंचाईची परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारसमोर एकीकडे शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी मदतीची गरज आहे, तर दुसरीकडे मोठ्या खर्चाच्या योजनांचे आर्थिक नियोजन करण्याचे आवाहन आहे. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या २६ योजना आणि २५ धोरणांचा फेरआढावा घेतला जाणार आहे. या योजनांवर १.२० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक खचार्चा आवाका असल्याचे सांगितले जात आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र महिलांना आर्थिक मदत दिली जाते. त्यामुळे या योजनेसाठी राज्याच्या अर्थसंकल्पातून मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करावी लागते. आता दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी अतिरिक्त मदतीची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेसह मोठ्या खर्चाच्या योजनांचे आर्थिक नियोजन पुन्हा चर्चेत आले आहे. दुष्काळामुळे सरकारसमोर दुहेरी आवाहन असल्याने आणि २६ योजना नि २५ धोरणांचा फेरआढावा घेतला जाणार असल्याने लाडकी बहीण योजना बंद होणार का? लाडकी बहीण योजनेचा फेरआढावा घेतला जाणार का? दुष्काळामुळे लाडकी बहीण योजनेवर परिणाम होणार का? २६ योजनांचा फेरआढावा का घेतला जात आहे? यासारखी अनेक प्रश्न उपस्थित होत आहे.

योजनांची अंमलबजावणी, खर्च आणि प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोच यांचे अधिक प्रभावी मॉनिटरिंग करण्यासाठी सरकारकडून राबवण्यात येणा-या २६ योजना आणि २५ धोरणांच्या अंमलबजावणीचा फेरआढावा घेतला जाणार आहे. या योजनांचा निधी योग्य पद्धतीने वापरला जात आहे का? योजना अपेक्षित परिणाम देत आहेत का? आणि त्याचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतो का? यावर लक्ष दिले जाणार आहे. यासाठी महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष अर्थात 'महा-टॅक' च्या माध्यमातून रिअल-टाइम मॉनिटरिंग व्यवस्था वापरण्यात येत आहे.

सध्या लाडकी बहीण योजना बंद करण्याचा अधिकृत निर्णय झाल्याचे यातून दिसत नाही. २६ योजना आणि २५ धोरणांचा फेरआढावा घेण्याचा अर्थ संबंधित योजना तातडीने बंद केल्या जातील किंवा त्यांचे पैसे थांबवले जातील, असा थेट निष्कर्ष काढता येत नाही. दुष्काळामुळे राज्याच्या आर्थिक नियोजनावर अतिरिक्त दबाव येऊ शकतो. मात्र योजनेच्या लाभांवर बदल होणार कि नाही हे निश्चित सांगता येत नाही. फेरआढाव्यात योजनांचा खर्च, अंमलबजावणी आणि लाभार्थ्यांपर्यंत पोहोच यांचा आढावा घेतला जाणार आहे. मराठवाडा आणि विदर्भातील पाणी व चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांसाठी मदतीची मागणी वाढत आहे. अशा परिस्थितीत सरकारला दुष्काळग्रस्त भागासाठी उपाययोजना करण्यासोबतच विविध कल्याणकारी योजनांसाठी निधीचे नियोजन करावे लागणार आहे. त्यामुळे पुढील काळात लाडकी बहीण योजनेसह मोठ्या आर्थिक आवाक्याच्या योजनांबाबत सरकार कोणते निर्णय घेते, याकडे महिलांसह सर्वांचे लक्ष राहणार आहे.

महाराष्ट्रात ऐन दुष्काळी परिस्थितीमुळे आणि ढासळत्या आर्थिक समीकरणांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकार अँक्शन मोडवर आले आहे. महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक) स्थापन करण्याची गरज सरकारला का भासली? राज्याची आर्थिक स्थिती नेमकी कशी आहे? अर्थसंकल्प सादर करताना ४०,५५२ कोटींची महसुली तूट आणि १.५ लाख कोटींची राजकोषीय तूट अपेक्षित धरण्यात आली होती. त्यातच नव्या आर्थिक वर्षाच्या पहिल्याच तिमाहीत राज्य सरकारने तब्बल ९७ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. आधीच 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना', शेतकऱ्यांना मोफत वीज आणि आता कर्जमाफी... यामुळे राज्यावरील कजार्चा बोजा तब्बल ११ लाख कोटींवर गेला. केवळ कर्जाचं व्याज फेडण्यासाठी यावर्षी ७० हजार कोटींचा विक्रमी खर्च होणार आहे. अशा बिकट आर्थिक परिस्थितीत दुष्काळी उपाययोजना करण्यासाठी सरकारला आणखी कर्ज काढण्याशिवाय पर्याय नाही. याच पार्श्वभूमीवर १.२० लाख कोटींपेक्षा जास्त खर्चाच्या योजनांचं थेट मूल्यमापन करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. मात्र, महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक) द्वारे कोणत्या योजनेचं आणि धोरणांचे मूल्यमापन होणार? आणि कसे होणार?

उद्योग, आयटी, इलेक्ट्रिक वाहन, ग्रीन हायड्रोजन, पर्यटन, गृहनिर्माण आणि महिला धोरण यासह २५ प्रमुख धोरणांचे, १.२० लाख कोटींच्या २६ प्रमुख योजनांचे दर तिमाही समांतर मूल्यमापन होणार...योजनांचा लाभ वेळेत आणि योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचतो का? खचार्ची गुणवत्ता आणि निरुपयोगी मालमत्ता यांचा आढावा, विविध विभागांमधील भ्रष्टाचाराचे छुपे मार्ग शोधून ते बंद करण्यासाठी ठोस निर्णय, मुख्यमंत्री कार्यालयाला थेट लाईव्ह डॅशबोर्ड आणि तिमाही अहवाल सादर करणं बंधनकारक असणार आहे. एकीकडे दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी अडचणीत आहेत, तर दुसरीकडे तिजोरीवर ११ लाख कोटींचा डोंगराएवढा कजार्चा भार राज्यावर आहे. मात्र मुख्यमंत्र्यांचे थेट या खर्चिक योजनांवर लक्ष असल्याने प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. अशा स्थितीत १.२० लाख कोटींच्या योजनांचा 'महा-टॅक' द्वारे घेतला जाणारा हा फेरआढावा सरकारी पैशांची उधळपट्टी थांबवेल की लाडकी बहीण सारख्या लोकप्रिय योजनांना कात्री लावेल याची उत्सुकता आहे.

- ७४९८८८५०६१

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# ५५० किलो गोपालकाल्याची 'वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स, लंडन'मध्ये नोंद

## कर्करोगाशी लढा देत शेफ नीता अंजनकर यांचा आणखी एक विक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**




तीनदा कॅन्सर सारख्या प्राणघातक आजाराशी लढा देणाऱ्या प्रसिद्ध शेफ नीता अंजनकर यांनी ५५० किलो गोपालकाला तयार करून आणखी एका विक्रमाची नोंद केली. रविवारी धनवटे नॅशनल कॉलेजच्या परिसरात हा कार्यक्रम झाला. नीता अंजनकर यांच्या या विक्रमाची 'वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स, लंडन' यांच्या ज्युरींकडून ऑनलाइन व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून नोंद घेण्यात आली व त्यांना अवॉर्ड आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. हा अवॉर्ड व प्रमाणपत्र त्यांना लंडनमध्ये आयोजित कार्यक्रमात सन्मानपूर्वक बहाल करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र टेलिकम्युनिकेशन नागपूरद्वारे आयोजित या कार्यक्रमाला नाग विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष स्वप्निल अहितकर, लायन्स क्लब ऑफ नागपूरचे अध्यक्ष विनोद गुप्ता, प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर, शंखनादच्या संचालिका राखी कुहीकर आणि संपादक सुनील कुहीकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते नीता अंजनकर यांचा सत्कार करण्यात आला.

'कॅन्सरला घाबरायचे नाही, त्याच्याशी लढायचे आणि जिंकायचे' असा सकारात्मक संदेश या निमित्ताने नीता अंजनकर यांनी दिला. विक्रमाची घोषणा झाल्यानंतर नीता अंजनकर यांनी ढोल-ताशांच्या गजरात नृत्य करत आनंद साजरा केला. त्यांच्या या कामगिरीबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले. प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनीदेखील या उपक्रमाला भेट देऊन त्याचे कौतुक केले.

यानिमित्ताने घेण्यात आलेल्या पाककला स्पर्धेचे परीक्षण शेफ पूनम राठी, विशाल चवरे, रिजवाना दीवान, नीरज जैन, रेवा यावलकर आणि मधुलिका चौधरी यांनी केले. स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके वितरीत करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. मोहन अंजनकर, विनोद अंभोरे, देवनाथ गंडाटे, सनी भोंगाडे, संजय कडवे, समीर गावंडे, मालाताई दोळके, सचिन ढेंगरे, सागर हजरा, तुलशी बावनथळे, देवांश ढेंगरे आणि प्रताप काशीकर यांच्यासह भुमिता सावरकर, अमीत बोरकर, स्वप्नील भोगेकर, रश्मी फाटे आणि सीमा सावरकर यांचे सहकार्य लाभले.

### नीता अंजनकर यांचे विक्रम

यापूर्वीही शेफ नीता अंजनकर यांनी इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये १,००० किलो आंबील तयार करण्याचा विक्रम नोंदविला आहे. तसेच ५०० किलो कच्चा चिवडा तयार करण्याची विक्रमी कामगिरीही त्यांच्या नावावर आहे. आता ५५० किलो गोपालकाला तयार करून त्या आणखी एका विक्रमाची नोंद केली आहे.

### विक्रमी गोपालकाल्यासाठी वापरलेले साहित्य

या महाकाय गोपालकाल्यासाठी सुमारे १०० किलो पोहे, ६० किलो डाळिंब, ५० किलो सफरचंद, ५० किलो पेरू, ५० किलो लाया, १०० किलो लोणचे तसेच इतर विविध साहित्याचा वापर करण्यात आला. या विक्रमासाठी नीता अंजनकर यांनी सुमारे तीन महिन्यांपासून तयारी आणि मेहनत घेतली होती. नियोजन, साहित्याची व्यवस्था आणि शेफ टीमच्या सहकार्याने हा मोठा उपक्रम यशस्वी करण्यात आला.

## नाना पाटेकर यांच्या हस्ते मनीष रामटेके सन्मानित



मनीष रामटेके यांनी पेंटिंग फोटो दिले भेट

**दै. सिंहवाणी वृत्त, सावरगाव**

जागर नामाचा दशक पूर्ण सोहळा या कार्यक्रमात (नाम फाउंडेशन) पुणे येथे केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, उद्योग मंत्री उदय सावंत, तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, फिल्म स्टार नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांचे उपस्थितीत मनीष रामटेके सोनौली (सावरगाव) तह. काटोल जिल्हा नागपूर यांचा सत्कार नाना पाटेकर यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमप्रसंगी नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे यांना मनीष रामटेके यांनी पेंटिंग फोटो भेट दिली. यावेळी पाटेकर आणि अनासपुरे यांनी मनीष रामटेके यांना सन्मानित केले. रामटेके यांनी दिलेल्या चित्राचे सर्वांनी कौतुक केले. तसेच मनीष रामटेके यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## बल्लारपूर शहराला कधीही विसरणार नाही : रविंद्र भंडारवार

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे**

बल्लारपूर नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी रविंद्र भंडारवार यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची समाजकल्याण विभागाची परीक्षा उत्तीर्ण करून उपआयुक्तपदावर निवड मिळवली आहे. मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते त्यांना नुकतेच नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. त्यांची नियुक्ती वाशिम येथे झाली आहे.

या यशाबद्दल बल्लारपूर शहरातील पत्रकारांच्या वतीने विश्रामगृह येथे त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय डुंबेरे होते. यावेळी पत्रकारांनी भंडारवार यांचे अभिनंदन करून पुढील प्रशासकीय कारकिदीर्साठी शुभेच्छा दिल्या.



सत्काराला उत्तर देताना रविंद्र भंडारवार यांनी आपल्या संघर्षमय प्रवासाला उजाळा दिला. गडचिरोली जिल्ह्यातील ज्या गावात त्यांचा जन्म झाला, त्या गावात त्यावेळी वीज नव्हती. गावात केवळ चौथीपर्यंत शिक्षणाची सोय होती. त्यानंतर सातवीपर्यंतचे शिक्षण घेण्यासाठी त्यांना तीन ते चार किलोमीटर अंतरावरील शाळेत जावे लागत होते. आठवीपासून अहेरी तालुक्यातील महागाव येथील आश्रमशाळेत त्यांनी शिक्षण घेतले. बारावी विज्ञान शाखेपर्यंत शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी डी.एड. केले.

२०१० मध्ये सिरोंचापासून सुमारे ६० किलोमीटर अंतरावरील दुर्गम भागात शिक्षक म्हणून त्यांनी सेवेला सुरुवात केली. मात्र, मनात असलेल्या प्रशासकीय सेवेत जाण्याच्या इच्छेमुळे त्यांनी पोलीस उपनिरीक्षक पदाची परीक्षा दिली. ही परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यांनी पोलीस विभागात सेवा बजावली. त्यानंतर लोकांची व्यापक स्वरूपात सेवा करण्याची इच्छा असल्याने त्यांनी पुन्हा स्पर्धा परीक्षा दिल्या. सीईटीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी थेट उपमुख्याधिकारी पदाची परीक्षा दिली आणि त्यातही यश मिळविले.

उपमुख्याधिकारी म्हणून काम करताना त्यांनी सुमारे पाच वर्षे गडचिरोली नगर परिषदेत सेवा बजावली. त्यानंतर त्यांची बदली बल्लारपूर येथे झाली. बल्लारपूरमध्ये कार्यरत असतानाच त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करून समाजकल्याण विभागाच्या उपआयुक्तपदाला गवसणी घातली. बल्लारपूरमध्ये काम करताना मला नागरिकांचे प्रेम आणि सहकार्य मिळाले. या शहराशी निर्माण झालेले नाते मी कधीही विसरणार नाही, असे भावनिक उदगार भंडारवार यांनी यावेळी काढले. तसेच नगर परिषदेत उपमुख्याधिकारी म्हणून आणखी एक वर्ष काम करण्याची संधी मिळाली असती तर अधिक समाधान वाटले असते, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

ग्रामीण व दुर्गम भागातून सुरू झालेला शिक्षण आणि प्रशासकीय सेवेचा प्रवास विविध पदांवर काम करत उपआयुक्तपदापर्यंत पोहोचल्याने त्यांच्या संघर्षाची आणि जिद्दीची चर्चा यावेळी करण्यात आली.

यावेळी पत्रकार राहुल गायकवाड, रमेश निषाद, अजय रासेकर, नारद प्रसाद, विशाल डुंबेरे, मंगेश रेंगुडवार, प्रशांत वैरागडे, राजू राठोड, प्रेम गहलोत, धनंजय पांढरे, शिवदास शर्मा, वसंत मुन सह आदी पत्रकार उपस्थित होते.

# वीज क्षेत्रातील बदलती आव्हाने पेलण्यासाठी महावितरण सज्ज: तत्पर ग्राहकसेवा, महसूलवाढ आणि आधुनिक तंत्रज्ञानावर भर

## संचालक धनंजय औंढेकर यांचा जनमित्रांशी थेट संवाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जागतिक पातळीवर वीज क्षेत्रात अत्यंत वेगाने आणि व्यापक प्रमाणात होणाऱ्या तांत्रिक बदलांची आव्हाने पेलण्यासाठी तसेच आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून भविष्यातील विजेची वाढती गरज पूर्ण करण्यासाठी महावितरण पूर्णपणे सज्ज झाली आहे. बदलत्या काळासोबत कंपनीने स्वीकारलेले हे सकारात्मक व तंत्रस्नेही बदल आत्मसात करणे ही काळाची गरज बनली आहे. या आधुनिक बदलांच्या माध्यमातून वीज ग्राहकांना अत्यंत तत्पर, पारदर्शक व दजेर्दार सेवा पुरवणे, कंपनीची महसूलवाढ साध्य करणे आणि शून्य थकबाकीचे ध्येय गाठणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी केले.

नागपूर येथील प्रादेशिक कार्यालयाच्या सभागृहात शनिवारी आयोजित वरिष्ठ अधिकारी, अभियंते व तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या भव्य सर्वसमावेशक आढावा बैठकीत जनमित्रांशी थेट संवाद साधताना ते बोलत होते. या आढावा बैठकीला नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक, अधीक्षक अभियंता अमित परांजपे (प्रादेशिक कार्यालय), संजय वाकडे (नागपूर ग्रामीण), प्रफुल लांडे (नागपूर शहर), दिपाली माडेलवार (इन्फ्रा), स्मीता पारखी (वर्धा) आणि वैभव पातोडे (चाचणी) यांच्यासह विविध विभागप्रमुख, उपविभागीय अधिकारी व इतर वरिष्ठ अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

संचालक धनंजय औंढेकर यांनी महावितरणचे धोरणात्मक मिशन आणि व्हिजन स्पष्ट करताना सांगितले की, सध्याच्या काळात स्मार्ट मीटर, छतावरील सौरऊर्जा (रुफटॉप सोलर), डिजिटलायझेशन आणि बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टीम (इएरर) यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे संपूर्ण वीज वितरण क्षेत्रात क्रांतिकारी आणि सकारात्मक परिवर्तन घडून येत आहे. स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांच्या प्रत्यक्ष वीज वापराचे मोजमाप अधिक अचूक, जलद आणि पारदर्शक होणार आहे. या आधुनिक प्रणालीमुळे मिळणारे प्रत्यक्ष फायदे ग्राहकांपर्यंत पोहोचवणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी महावितरणच्या सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ग्राहकांशी प्रत्यक्ष भेटून सुसंवाद साधावा आणि स्मार्ट मीटरबाबत जनमानसात असलेले गैरसमज दूर करावेत, असे आवाहन त्यांनी केले.



त्यांनी पुढे नमूद केले की, भविष्यातील विजेची वाढती मागणी पर्यावरणपूरक मार्गाने पूर्ण करण्यासाठी अक्षय ऊजेर्चा वापर वाढवणे अनिवार्य झाले आहे. यासाठी केंद्र शासनाच्या 'पीएम सूर्यघर मोफत वीज योजना' आणि 'स्मार्ट सोलर योजने'चा प्रसार व प्रचार तळागाळातील ग्राहकांपर्यंत व्यापक स्तरावर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. यामुळे ग्राहकांच्या वीज बिलात थेट बचत तर होईलच, शिवाय स्वच्छ व हरित ऊर्जेच्या वापराला मोठी गती मिळेल. भविष्यात दिवसभरात मोठ्या प्रमाणावर निर्माण होणारी अतिरिक्त सौरऊर्जा रात्रीच्या वेळी वापरासाठी उपलब्ध व्हावी म्हणून बॅटरी स्टोरेज तंत्रज्ञान आणि हायड्रोजनसारख्या पर्यायी इंधनाचा वापर आगामी काळात अत्यंत निर्णायक ठरेल, असेही त्यांनी अधोरेखित केले.

कंपनीच्या आर्थिक स्थैयार्बाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, मागील वर्षभरात महावितरणने राज्यभरात सुमारे ४१ हजार वीजचोऱ्या उघडकीस आणल्या होत्या. मात्र, चालू वर्षाच्या अवघ्या पहिल्या तीन महिन्यांतच तब्बल ५० हजारांहून अधिक वीजचोऱ्या उघडकीस आणून मोहिमेला अभूतपूर्व यश मिळवून दिले आहे. वीजचोरीविरुद्ध महावितरणची ही आक्रमक आणि धडक मोहीम यापुढेही अधिक तीव्रतेने सुरूच राहील असा इशारा देत वीजचोरांवर सामाजिक वचक निर्माण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. वीजचोरीचा हा प्रकार मुळापासून नष्ट करून वीज वितरण व्यवस्थेची तांत्रिक कार्यक्षमता वाढवणे आणि कंपनीच्या महसुलात भरीव वाढ करणे हे महावितरणचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने वीज क्षेत्रातील हे नवीन तंत्रज्ञान वेगाने आत्मसात करून समर्पित भावनेने, जबाबदारीने आणि सांघिक कौशल्याने काम करण्याचे आश्वासन दिले. संचालक औंढेकर यांनी नागपूर परिमंडलाकडून व्यक्त केलेल्या सर्व अपेक्षा यशस्वीपणे पूर्ण केल्या जातील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या बैठकीस नागपूर व वर्धा जिल्ह्यातील सर्व विभागांचे कार्यकारी अभियंते अमित शिवलकर (नागपूर), प्रीती फुले (नागपूर शहर मंडल), शर्मिला इंगळे (वर्धा), संतोष क्षीरसागर (गांधीबाग), धम्मदीप फुलझले (सिव्हिल लाईन), राहुल जीवतोडे (काँग्रेसनगर), डॉ. गजानन जयस्वाल (महाल), प्रशांत टेंभेकर (बुटीबोरी), नरेश पारधी (वर्धा) आणि प्रदीप घोरुडे (हिंगणघाट) यांच्यासह उपविभागीय अधिकारी, तांत्रिक कर्मचारी आणि जनमित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थोडक्यात

### कोदामेंढी येथे आज विशेष सखोल पुनरिक्षण नोटीसवर सुनावणी

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

कोदामेंढी येथे एकूण तीन बूथ असून बुथ क्रमांक १६० मध्ये ११६० मतदारांपैकी ९४८ मतदार, बूथ क्रमांक १६१ मध्ये ११०८ मतदारांपैकी ९७३ मतदार तर बुथ क्रमांक १६२ मध्ये ८०९ मतदारांपैकी ६६० मतदारांची नावे विशेष सखोल पुनरिक्षण २०२६ चे अंतर्गत तयार करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादी समाविष्ट करण्यात आलेले आहे. इतर उर्वरित मतदारांची नावे मतदार मृत पावल्यामुळे, लग्न झाल्याने किंवा इतर कारणामुळे स्थानांतर झाल्यामुळे व इतर कारणामुळे वगळण्यात आलेली आहे.समाविष्ट करण्यात आलेल्या मतदारांपैकी मतदारांची नावे मॅपिंग न झालेल्या व इतर कारणामुळे बूथ क्रमांक १६० मधील ७३ मतदारांना, बूथ क्रमांक १६१ मधील ४० मतदारांना तर बूथ क्रमांक १६२ मधील ९२ मतदारांना नोटीस बजावण्यात आल्या असून त्यांची सुनावणी उद्या सोमवार (ता.५ ऑक्टोबर)ला व परवा मंगळवार (ता. ६ ऑक्टोबर)ला ग्रामपंचायत कार्यालय कोदामेंढी येथे होणार असल्याचे नोटीस मध्ये नमूद करण्यात आले.

बूथ क्रमांक १६० मधील ७३ मतदारांची सुनावणी ग्रामपंचायत कार्यालय येथे उद्या सोमवार (ता. ५ ऑक्टोबर)ला दुपारी १२.३० ते २.३० दरम्यान तर बूथ क्रमांक १६१ मधील ४० मतदारांची सुनावणी दुपारी ३ ते सायं. ५ दरम्यान होणार असल्याचे नोटीस मध्ये नमूद आहे. तर बूथ क्रमांक १६२ मधील ९२ मतदारांची सुनावणी परवा मंगळवार (ता. ६ ऑक्टोबर)ला होणार आहे. प्रारूप मतदार यादीतही रक्क्रपूर्वीच्या मृत पावलेल्या काही मतदारांची नावे कायम असल्याची माहिती सोशल मीडियाच्या ग्रुप वर ग्रामपंचायत सदस्य स्वाती संदीप गौरखेडे व पत्रकार संदीप गौरखेडे यांनी एक आठवड्यापूर्वी बीएलओ यांनी प्रारूप मतदार याद्या ग्रामपंचायतला दिल्यानंतर नुकतीच टाकली होती. याबाबत बूथ क्रमांक १६० च्या बीएलओ माधुरी बावनकुळे, १६१ च्या बीएलओ सूर्यकांता बावनकुळे यांना भ्रमणध्वनी वरून व प्रत्यक्ष जाऊन याबाबत विचारपूस केली असता चुकीने १-१ मृत मतदाराचे नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट असल्याचे त्यांनी मान्य केले व ते नाव आता सुनावणी दरम्यान कमी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. बूथ क्रमांक १६२ मध्ये रक्क्रपूर्वी एकही मृत व्यक्तीची नावे समाविष्ट नसून रक्क्रझाल्यानंतर मृत पावलेल्या मतदारांची नावे आता सुनावणी दरम्यान कमी करण्यात येणार असल्याचे बीएलओ दुर्गा ढोमणे यांनी भ्रमणध्वनीवरून सांगितले. त्यामुळे नवीन मतदार यादी ही शंभर टक्के मतदारांची कलर फोटो असलेले, अचूक व संपूर्ण पारदर्शित बनणार असल्याचे तीनही बीएलओ यांनी सांगितले.

### आनंददायी शनिवार अंतर्गत तोंडली शाळेत विद्यार्थ्यांचा पाककला उपक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू :मौदा**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडली येथे 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी पाककला उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. कृतीतून शिक्षण या संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी विविध पाककृती तयार करण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. उपक्रमात विद्यार्थ्यांनी पोळी बनविण्याची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष कृतीतून अनुभवली. पोळीसाठी कणिक मळणे, तिचे योग्य आकाराचे गोळे बनवणे, पाटावर लाटणे, बेलनाच्या साहाय्याने पोळीला योग्य आकार देणे आणि त्यानंतर ती तव्यावर भाजणे, या सर्व प्रक्रिया विद्यार्थ्यांनी स्वतः करून पाहिल्या. तसेच भाजी तयार करण्यासाठी आवश्यक साहित्याची जमवाजमव करणे, साहित्याची निवड करणे, स्वच्छता राखणे आणि भाजी बनविण्याचा योग्य क्रम लक्षात घेऊन कृती करणे, याचा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. यामुळे विद्यार्थ्यांना केवळ पाककलेची माहिती न मिळता नियोजन, क्रमबद्धता, स्वच्छता, सहकार्य, वेळेचे नियोजन आणि स्वावलंबन यांसारखी जीवनोपयोगी कौशल्ये शिकता आली.

विद्यार्थ्यांनी गटागटाने उत्साहाने सहभाग घेत एकमेकांना सहकार्य केले. प्रत्यक्ष कृती करताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि उत्साह या उपक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यासाठी सहशिक्षक निलेश जाधव यांनी विशेष सहकार्य केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन करत उपक्रमाच्या नियोजन व अंमलबजावणीत सक्रिय सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान न घेता दैनंदिन जीवनातील आवश्यक कौशल्ये प्रत्यक्ष अनुभवातून आत्मसात करावीत, हा या उपक्रमामागील उद्देश आहे, असे मुख्याध्यापिका अनुराधा विठ्ठल धुर्डे यांनी सांगितले. या उपक्रमामुळे तोंडली शाळेतील आनंददायी, कृतीशील आणि अनुभवाधारित शिक्षणाला अधिक चालना मिळाली.

### श्री उमियाशंकर नारायणजी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे उज्ज्वल यश



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्री उमियाशंकर नारायणजी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी अलीकडेच आयोजित करण्यात आलेल्या आंतरशालेय वादविवाद व चित्रकला स्पर्धेमध्ये देदिप्यमान यश संपादन केले. श्री पकवासा गुजराती गर्ल्स हायस्कूलतर्फे कै. शांतीलाल बदानी यांच्या स्मृतीप्रत्यर्थ आंतरशालेय वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत २४ शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत नववीतील विद्यार्थिनी इशिका तिवारी हिने अत्यंत आत्मविश्वासाने आणि प्रभावीपणे आपले विचार मांडत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत आठवीतील विद्यार्थी आयुष साकरे याने आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करत तृतीय क्रमांक पटकावला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रविकांतजी मोर, संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र झा, महासचिव संजय ठाकर, खेतालाल पटेल, चंद्रेश बदानी, परीक्षक डॉ. पसीने, ज्योतिरादित्य सिंह आणि शाळेच्या मुख्याध्यापिका संतोषी गुप्ता विशेष रूपाने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अंशुल जिचकार यांनी केले.

थोडक्यात

## नागपूर शहर काँग्रेस कमिटी ब्लॉक ४ चे पदग्रहण



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहर काँग्रेस कमिटी अंतर्गत दक्षिण नागपूर क्षेत्रातील ब्लॉक क्रमांक ४ चे पदग्रहण समारंभ नुकताच रमणा मारुती परिसरात पार पडला. यावेळी प्रामुख्याने नागपूर शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष प्रफुल गुडधे, पदवीधर मतदारसंघाचे आमदार अभिजीत वंजारी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी महासचिव गिरीश पांडव, ब्लॉक ४ चे माजी अध्यक्ष प्रवीण गवरे, नगरसेवक सुहास नानवटकर, राजेश पौनीकर, ज्येष्ठ कार्यकर्ते ईश्वर ढोले, युवक काँग्रेस प्रदेश सचिव रोमा चौधरी, रंजना कडुकर, वैशाली वानखेडे, राजू मोहोड, पुरुषोत्तम मुरमे, सुरेश जिचकार, एकनाथ काळमेघ, महेश बांते , सौरभ काळमेघ उपस्थित होते.

यावेळी बोलताना शहर अध्यक्ष प्रफुल गुडधे यांनी ब्लॉक ४ चे नवनियुक्त अध्यक्ष राहुल अभंग यांनी नागपूर शहरातील सर्वात पहिली कार्यकारिणी जाहीर केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. नवनियुक्त कार्यकारिणीमध्ये मोरेश्वर वंजारी, प्रकाश जाधव, संजय बडवाईक, रोशन बुधबावरे, राहुल श्रीराव, नाना शेंडे, विनोद राऊत, दिलीप कोसारे, भास्कर अत्तकरी, मनोज हिवरे, मनदीप ताम्रकार, जयचंद गाथणे, सागर तुर्केल, आनंद्राव वानाईत, किशोर कुंभारे, मुकुंद हटवार, आकाश लोखंडे, नरेश लांजेवार, मनोज कारलेवार, मोहसिन खान, आकीब शेख, हिमांशू शहाकार, योगेश होपे, प्रसाद झाडे, आशीष मस्ते, हार्दिक खोरगडे, महेश वैरागडे, प्रकाश फेतफुलवार, आनंद वानाईत, क्षितीज इंगळे, मधुकर पडोळे, ईशांतकुमार थामदेव भाकरे, सुरेश घोरे, नितीन काकडे आणि पियुष गुडधे यांचा समावेश आहे.

## भोसले घराण्याचा ऐतिहासिक हडपक्या गणराया भारतीय संस्कृती व परंपरेचे प्रतिक : रमेश लांजेवार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्राची उपराजधानी व भौगोलिक दृष्ट्या भारताचा केंद्रबिंदू असलेल्या नागपूरमध्ये आजही २३९ वर्षांची वैभवशाली संस्कृतीची ओळख भोसले राजघराण्याच्या वतीने पारंपारिक ऐतिहासिक परंपरा जपण्याचे काम भोसले राजघराणे महाराजा ऑफ नागपूर ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष श्रीमंत राजे मुधोजी महाराज भोसले यांच्यावतीने होत आहे. त्यामुळेच आज आपल्याला भारतीय संस्कृती व परंपरागत संस्कृतीने दिलेला



हडपक्या गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा होतांना दिसतो आणि ही परंपरा हडपक्या गणपती उत्सवाच्या निमित्ताने संस्कृतीला जपण्याची शिकवण सुध्दा युवा पिढीला प्रेरणादायी ठरणारी आहे. हा ऐतिहासिक हडपक्या गणेशोत्सव तब्बल दहा दिवस चालतो.

या अनुषंगाने मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रम होतात. त्याचप्रमाणे ऐतिहासिक वारसा पहाण्यासाठी राज्यातील अनेक मान्यवर व भक्तगण सिनियर भोंसला पॅलेस महाल नागपूर येथे हडपक्या गणरायाचे दर्शन घेण्यासाठी येत असतात आणि वैभवशाली संस्कृतीचे दर्शन सर्वांना होत असते.याप्रसंगी महाराजा ऑफ नागपूर ट्रस्ट हडपक्या गणेशोत्सवाला सदिच्छा भेट देऊन दर्शन घेतले व सर्वत्र सुख-शांती नांदावी, दुष्काळाचे सावट दूर व्हावे आणि निसर्ग प्रफुल्लित रहावा अशी गणरायाच्या चरणी प्रार्थना केली. यावेळी महाराजा ऑफ नागपूर ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष श्रीमंत राजे मुधोजी भोसले, स्वतंत्र पत्रकार रमेश लांजेवार व अनेक मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

## पालक-शिक्षक संवादातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना

### श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींच्या शाळेत 'मुक्त संवाद' कार्यक्रमाचे आयोजन




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर यांच्या वतीने श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींच्या शाळेत 'पालक-शिक्षक योग्य समन्वयासाठी मुक्त संवाद' या कार्यक्रमाचे आयोजन रविवारी करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रविंद्र फडणवीस होते तर प्रमुख अतिथी म्हणून बालरक्षण समन्वयक, जिल्हा परिषद नागपूर प्रसेनजित गायकवाड होते. प्रसेनजीत गायकवाड म्हणाले, एआय कितीही प्रगत झाले तरी ते मानवनिर्मित कृत्रिम बुद्धिमत्तेचे साधन आहे.

विद्यार्थ्यांच्या चौकस बुद्धीला, जिज्ञासेला आणि सर्जनशीलतेला पोषक वातावरण निर्माण करून देणे, त्यांना प्रश्न विचारण्यास प्रवृत्त करणे आणि स्वतःच्या विचारातून ज्ञान मिळविण्यासाठी प्रेरित करणे, हेच शिक्षकांचे महत्त्वाचे कार्य असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका माया बमनोटे, उपमुख्याध्यापक सुबोध आष्टीकर, प्रायमरी विभागाच्या मुख्याध्यापिका सुरेखा वासनिक व शाळेतील शिक्षकवृंद व पालकांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पल्लवी देशमुख यांनी तर सूत्रसंचालन राजेश सुलभेवार यांनी केले.

# अभिजित वंजारी यांच्या प्रचाराचा शुभारंभ, महाविकास आघाडीची एकजूट

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र विधानपरिषद नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी काँग्रेस तथा महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार ॲड. अभिजित वंजारी यांच्या प्रचाराचा शुभारंभ सोमवारी (५ ऑक्टोबर) जवाहर विद्यार्थी गृह, सिव्हिल लाईन्स येथे करण्यात आला. यावेळी काँग्रेसचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, गटनेते तथा ब्रह्मपुरीचे आमदार



विजय वडेट्टीवार, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा साकोलीचे आमदार नाना पटोले, माजी मंत्री सुनील केदार, माजी मंत्री अनिल देशमुख, गडचिरोलीचे खासदार नामदेव किरसान, रामटेकचे खासदार श्याम कुमार बर्वे, भंडारा-गोंदियाचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे, माजी मंत्री रणजीत कांबळे, राजेंद्र मुळक, अनिस अहेमद, पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे, आमदार सुधाकर अडबाले, आरमोरीचे आमदार रामदास मसराम यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे महासचिव गिरीश पांडव, प्रवक्ते अतुल लोंढे, सुरेश भोयर, सलील देशमुख, शेखर शेंडे, नाना गावंडे, नागपूर शहर काँग्रेसचे उपाध्यक्ष तथा माजी नगरसेवक पुरुषोत्तम हजारे, अतुल कोटेचा, वसीम शेख, अभिजित झा, सुहास नानवटकर, सर्व ब्लॉक अध्यक्ष, महिला काँग्रेसच्या पदाधिकारी तसेच नागपूर महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते संजय महाकाळकर यांच्यासह वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी उपस्थित नेत्यांनी नागपूर विभागातील पदवीधर मतदारांचे प्रश्न आणि हक्क विधानपरिषदेत मांडण्यासाठी ॲड. अभिजित वंजारी यांच्या उमेदवारीला पाठिंबा देण्याचे आवाहन केले. पदवीधर, युवक, शिक्षण आणि रोजगाराशी संबंधित प्रश्नांवर आवाज उठविण्यासाठी व्यापक जनसंपर्क अभियान राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

नागपूर विभागातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकजुटीने प्रचारात सहभागी होऊन ॲड. अभिजित वंजारी यांच्या प्रचारासाठी मतदारांपर्यंत पोहोचण्याचा संकल्प केला. प्रचाराच्या शुभारंभामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, ॲड. अभिजित वंजारी यांनी नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आघाडीचे उमेदवार म्हणून नामांकनपत्र दाखल केले आहे.

## जनतेच्या प्रश्नांसाठी सदैव कटिबद्ध संतोष भुजाडे यांचा विशेष सत्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या, जनतेचे विविध प्रश्न आणि त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने आवाज उठवून शासन- प्रशासनाचे लक्ष वेधून घेणारे सामाजिक व सार्वजनिक कार्यकर्ते संतोष भुजाडे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बजाज नगर, नागपूर येथील कार्यालयात विशेष सत्कार करण्यात आला. जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत त्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या त्यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला. सामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, स्थानिक पातळीवरील प्रश्न तसेच नागरिकांच्या मूलभूत हक्कांशी संबंधित विषय शासन-प्रशासनासमोर ठामपणे मांडण्याचे काम संतोष भुजाडे सातत्याने करीत असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी नमूद केले. जनतेच्या अडचणी केवळ ऐकून न घेता त्या सोडविण्यासाठी



संबंधित प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याची त्यांची कार्यपद्धती कौतुकास्पद असल्याचेही उपस्थितांनी सांगितले.

यावेळी मनोगत व्यक्त करतांना प्रशांत पवार आणि शिवराज गुजर यांनी पक्षासाठी तसेच जनतेसाठी प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम करणाऱ्या कार्यकत्यार्चा योग्य सन्मान होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. 'पक्षासाठी आणि जनतेसाठी झटणाऱ्या कार्यकर्त्याचा योग्य सन्मान व्हायलाच हवा,' असे त्यांनी सांगितले. कार्यकर्त्यांच्या सामाजिक योगदानाला प्रोत्साहन मिळाल्यास जनहिताच्या कामांना अधिक बळ मिळते, असेही त्यांनी स्पष्ट केले. जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि नागरिकांच्या हक्कांसाठी खंबीरपणे उभे राहण्याचा संतोष भुजाडे यांचा संकल्प प्रेरणादायी असल्याचे उपस्थितांनी सांगितले. समाजातील सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाच्या विविध स्तरांवर प्रश्न मांडणे, त्यांचा पाठपुरावा करणे आणि आवश्यक त्या ठिकाणी जनतेच्या बाजूने भूमिका घेणे, ही लोकप्रतिनिधित्वाची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

सत्काराला उत्तर देताना संतोष भुजाडे यांनी जनतेने दाखविलेला विश्वास हीच आपली खरी ताकद असल्याचे सांगून आगामी काळातही सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी प्रामाणिकपणे कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला. जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक त्या पातळीवर सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल आणि नागरिकांच्या हक्कांसाठी आपला आवाज बुलंद ठेवला जाईल, अशी भूमिका त्यांनी यावेळी व्यक्त केली. दरम्यान, उपस्थित मान्यवरांनी संतोष भुजाडे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील सामाजिक व सार्वजनिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. जनहिताच्या विविध प्रश्नांसाठी त्यांचे कार्य आगामी काळातही अधिक व्यापक होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या सत्कार कार्यक्रमाला योगेश ज्ञानेश्वर धोटे पाटील, भारत ठाकरे, कुलवंत सिंग भामरा, तुषार ढोबळे, मनोज जरेल, आशिष खुबळकर, गोविंदराव सोमकुवर, गोविंदराव सूत्रवे, आल्हाद जंगम, मिलिंद महादेवकर, सुखदेव वंजारी, अमरीश ढोरे, कपील मेश्राम, शोभाताई येवले यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालय जिल्हा शल्य अधीक्षकपदी डॉ.भास्कर सोनारकर यांची नियुक्ती



**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर :-(धनंजय पांढरे)**

आपली कर्म आणि जन्मभूमी असलेल्या बल्लारपूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज आणि विषभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पूणार्कृती पुतळ्यांना पुष्पहार घालून त्यांच्या महान विचारांना अभिवादन करून आपल्या कार्याची सुरुवात करतांना आपल्याला अपार आनंद होत असल्याचे मत नवनियुक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर भास्कर सोनारकर यांनी व्यक्त केले.ते बल्लारपूर ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी डॉ.गजानन मेश्राम आणि बल्लारपूर ग्रामीण रुग्णालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी आयोजित एका छोटेखानी शुभेछा कार्यक्रमात शुभेच्छुकांना मार्गदर्शन करतांना बोलत होते.दरम्यान बल्लारपूर ग्रामीण रुग्णालयातील चमू नी डॉ.भास्कर सोनारकर यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ.आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन केले.

११ एप्रिल १९८० रोजी जन्मलेल्या डॉ. भास्कर रमेश सोनारकर यांनी अतिदुर्गम समजल्या जाणाऱ्या जिवती तालुक्यातील टेका मांडवा या गावातून डॉ.म्हणून आरोग्य सेवेची सुरवात केली. या दरम्यान त्यांनी मूल,बल्लारपूर,चंद्रपूर या शहरातही वैद्यकीय अधिकारी म्हणून काम सांभाळले.दरम्यान त्यांना दोनवेळा बल्लारपूर ग्रामीण रुग्णालयात सेवेची संधी मिळाली. अत्यंत कमी वयात जिल्हा शल्य चिकित्सक पदाची जबाबदारी मिळाल्याने त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. खरेतर आरोग्य विभागात डॉक्टर,नर्सेस प्रामाणिक काम करतात.बरेच अधिकारी रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा म्हणून कर्तव्य बजावतात.असे असतांनाही काही अपवादात्मक अधिकारी कर्मचारी कामचुकारपणा करतात.रुग्णांकडे दुर्लक्ष करतात. अशा अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांच्या वारंवार तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांची गय केली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांपर्यंत सुरळीत आरोग्यसेवा पोहचविणे हाच उद्देश!**

जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील आरोग्य सेवा आणखी पारदर्शी आणि सुरडीत करण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करणार असून जिल्यातील,प्रत्येक तालुक्यातील शासकीय रुग्णालयात कोणत्या बाबीची कमतरता असेल तर शासकीय स्तरावर विनंती करून ती दूर करण्याचा प्रयत्न आपण करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**जिल्ह्यातील प्रत्येक रुग्णालयाला भेट देण्याचा प्रयत्न**

जिल्ह्यातील प्रत्येक रुग्णालयाला शासकीय आरोग्य सेवेचा लाभ मिळावा यासाठी जिल्यातील शासकीय रुग्णालयांना भेटी देऊन तिथल्या आरोग्य विषयक समस्या सोडविण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.आवश्यक मनुष्यबळ नसल्याने अनेक समस्या उद्भवतात.त्यांचा समन्वय साधून आवश्यक तेथे योग्य नियोजन करणार असून,जिल्यातील प्रत्येक शासकीय रुग्णालयाला भेट देऊन तेथील समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## शेतात काम करताना वाघाने घेतला जीव : आगरझरीत ६० वर्षीय महिलेचा करुण अंत

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर (धनंजय पांढरे )**

रोजच्या जगण्यासाठी शेतात काम करण्यासाठी गेलेल्या ६० वर्षीय महिलेवर दबा धरून बसलेल्या वाघाने हल्ला केला. या हल्ल्यात महिलेचा जागीच मृत्यू झाला. मोहर्ली वनपरिक्षेत्रातील आगरझरी-२ बिटात आज सोमवार दि. ५ ऑक्टोबर रोजी दुपारी घडलेल्या या हृदयद्रावक घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मंदा सूर्यभान मंगाम (वय अंदाजे ६०), रा. आगरझरी या राखीव वन कक्ष क्रमांक १८७



लगत असलेल्या सर्व्हे क्रमांक १०/४ मधील स्वतःच्या शेतात शेतीची कामे करीत होत्या. दुपारी सुमारे २.३० वाजताच्या सुमारास अचानक वाघाने त्यांच्यावर हल्ला केला. वाघाच्या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच दुर्गापूर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष थिपे आणि पोलीस निरीक्षक संतोष शेगावकर यांच्या उपस्थितीत घटनास्थळाचा तसेच मृतदेहाचा पंचनामा करण्यात आला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर येथे पाठविण्यात आला.

मंदा यांच्या मृत्यूने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घरातील कर्त्या सदस्याला अशा दुर्दैवी पद्धतीने गमावल्याने कुटुंबीयांना मोठा धक्का बसला आहे. घटनेनंतर आगरझरी परिसरातील नागरिकांमध्येही भीतीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाकडून मृत महिलेचे पती सूर्यभान लक्ष्मण मंगाम यांना घटनास्थळी तातडीची मदत म्हणून ५० हजार रुपयांची मदत देण्यात आली. दरम्यान, हल्ला करणाऱ्या वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी घटनास्थळ परिसरात कॅमेरा ट्रॅप लावण्यात आले आहेत. तसेच आगरझरी येथील नागरिकांना सतर्क राहून शेतातील कामे करताना विशेष काळजी घेण्याचे आवाहन करत जनजागृती करण्यात येत आहे. या घटनेचा पुढील तपास मोहलीर्चे वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष थिपे करीत आहेत.

## बिबट्याने केली गोऱ्याची शिकार

### खंडाळा पारडी शेत शिवारातील घटना, शेतकऱ्याचे ५० हजार रुपयांचे नुकसान, शेतकरी भयभीत

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी तालुक्यातील खंडाळा (म) येथील शेतकरी विष्णू वामन गोतमारे यांच्या शेतातील गोठ्यात बांधलेल्या गोऱ्या वर वाघाने (बिबट्या) झडप घालुन शिकार केल्याची घटना रविवारच्या पहाटे (दि. ४ ऑक्टोंबर) उघडकीस आली. या घटनेत शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान झाले असुन परीसरातील



शेतकऱ्यांमध्ये भिंतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी विष्णू गोतमारे नेहमी प्रमाणे सायंकाळच्या वेळी गुरे ढोरे गोठ्यात बांधुन सायंकाळी घरी गेले. सोमवारी सकाळी शेतात गेले असता गोठ्यात बांधलेला गोरा दिसुन येत नसल्याने त्यांच्या शोध घेतला असता गोरा मृत अवस्थेत दिसुन आला. तर वाघाने (बिबट्या) गोरयाची शिकार करुन अर्धेअधिक फस्त केल्याचे दिसुन आले. लागलीच या घटनेची माहिती पारशिवनी येथील वन विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली. घटनेचे गांभीर्य पाहता तात्काळ वन विभागाचे अधिकारी घटना स्थळी दाखल होऊन पंचनामा केला. या घटनेत शेतकर्यांचे ५० हजार रूपयांचे आर्थिक नुकसान झाल्याच्या प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत असुन नुकसानग्रस्त शेतकऱ्याला तातडीने वन विभागाच्या वतीने आर्थिक सहाय्य करण्याची मागणी पिढीत शेतकऱ्यांनी केली आहे.

**वाघाची दहशत, शेतकरी भयभीत, शेतीच्या कामात व्यत्यय**

पारशिवनी तालुक्यातील अनेक गावं खेड्यात ( बिबट्या )वाघ प्राण्यांची शिकार करत असुन सतत च्या शिकारीचा घटना घडत असल्याने शेतकरी, शेतमजुर भयभीत झाले आहेत. शेतीत कामासाठी मजुरीसाठी जाणारे शेतमजूर वाघाच्या भितीने शेतात काम करण्यासाठी येण्यास नकार देत असल्याने शेतीची कामे खोळंबली असुन शेतकऱ्यांचे हाती तोंडी आलेले पिकांचे नुकसान होण्याचे शक्यता वर्तवण्यात येत आहे. या भागात असलेल्या बिबट्याला लवकरात लवकर वन विभागाने बंदिस्त करुन जंगलात सोडण्याची मागणी शेतकऱ्यांच्यावतीने केली जात आहे.

# गो-विज्ञान अनुसंधान केंद्र, देवलापार में पांच नवीन प्रकल्पों का लोकार्पण

## एवं दो महत्वपूर्ण प्रकल्पों की घोषणा, श्रद्धेय अशोकजी सिंघल जन्मशताब्दी वर्ष के शुभारंभ अवसर पर सरसंघचालक डॉ. मोहन भागवत के शुभहस्ते होगा समारोह का शुभारंभ






**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर**

श्रद्धेय अशोकजी सिंघल जन्मशताब्दी वर्ष के शुभारंभ अवसर पर गो-विज्ञान अनुसंधान केंद्र, गौतीर्थ, देवलापार में विभिन्न नवीन प्रकल्पों के शुभारंभ एवं लोकार्पण समारोह का आयोजन बुधवार, ७ अक्टूबर २०२६ को किया जा रहा है। यह समारोह गो-संवर्धन, पंचगव्य अनुसंधान, प्राकृतिक चिकित्सा तथा गो-आधारित विविध क्षेत्रों में केंद्र द्वारा किए जा रहे कार्यों को नई दिशा देने की दृष्टि से महत्वपूर्ण होगा।

गौतीर्थ, देवलापार में ऑर्गेनिक मैन्योर यूनिट, जिसे आर.सी. प्लास्टो के सीएसआर सहयोग से स्थापित किया गया है, का लोकार्पण; देशी गोवंश की नस्ल गुणवत्ता सुधार के लिए आईवीएफ यूनिट; रामदेवबाबा यूनिवर्सिटी, नागपुर के सहयोग से निर्मित गो-आधारित बैल चालित विद्युत उत्पादन यूनिट का लोकार्पण; ग्रामीण कारीगरों एवं रोजगार को बढ़ावा देने के उद्देश्य से रानी दुर्गावती ग्रामीण हाट का लोकार्पण; तथा पंचगव्य कैंसर हीलिंग यूनिट और गो-विज्ञान यूनिवर्सिटी की घोषणा की जाएगी। इन महत्वपूर्ण प्रकल्पों के माध्यम से गो-विज्ञान, अनुसंधान, प्राकृतिक चिकित्सा, ग्रामीण रोजगार, स्वावलंबन और देशी गोवंश के संरक्षण एवं संवर्धन के क्षेत्र में केंद्र के कार्यों को नई दिशा और व्यापक आयाम मिलने की अपेक्षा है।

गो-विज्ञान अनुसंधान केंद्र द्वारा पिछले अनेक वर्षों से गोवंश संरक्षण एवं संवर्धन के साथ पंचगव्य आयुर्वेद औषधि अनुसंधान, पंचगव्य चिकित्सा, प्राकृतिक एवं जैविक कृषि, गोमय आधारित मूल्यवर्धित उत्पाद, देशी गोवंश की नस्ल सुधार तथा ग्रामीण एवं आदिवासी समाज के आर्थिक सशक्तीकरण के क्षेत्र में निरंतर कार्य किया जा रहा है। इन प्रयासों को वैज्ञानिक अनुसंधान और आधुनिक तकनीक से जोड़ते हुए केंद्र द्वारा विभिन्न नवीन प्रकल्प विकसित किए जा रहे हैं।

ऑर्गेनिक मैन्योर यूनिट के माध्यम से गो-आधारित जैविक खाद के उत्पादन को बढ़ावा मिलेगा और प्राकृतिक एवं टिकाऊ कृषि के लिए उपयोगी विकल्प उपलब्ध होगा। वहीं, आईवीएफ यूनिट के माध्यम से उच्च गुणवत्ता वाले देशी गोवंश की नस्ल सुधार एवं संवर्धन को वैज्ञानिक तकनीक के साथ आगे बढ़ाने का प्रयास किया जाएगा।

रामदेवबाबा यूनिवर्सिटी, नागपुर के सहयोग से निर्मित बैल चालित विद्युत उत्पादन यूनिट परंपरागत गो-आधारित व्यवस्था और आधुनिक तकनीक के समन्वय का अभिनव उदाहरण है। दूसरी ओर, रानी दुर्गावती ग्रामीण हाट के माध्यम से ग्रामीण कारीगरों को बाजार उपलब्ध कराने तथा स्थानीय स्तर पर रोजगार और स्वरोजगार के अवसरों को बढ़ावा देने का प्रयास किया जाएगा। इस अवसर पर पंचगव्य कैंसर हीलिंग यूनिट तथा गो-विज्ञान यूनिवर्सिटी की घोषणा भी की जाएगी। पंचगव्य एवं गो-आधारित अनुसंधान और प्राकृतिक चिकित्सा के क्षेत्र में केंद्र के कार्यों को संस्थागत एवं व्यापक स्वरूप देने की दिशा में इन दोनों प्रस्तावित प्रकल्पों को महत्वपूर्ण पहल माना जा रहा है।

कार्यक्रम का शुभारंभ परम पूजनीय सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत जी के शुभहस्ते होगा। समारोह में चंद्रशेखरजी बावनकुळे, मंत्री, महसूल एवं पालकमंत्री, नागपुर जिला; आलोक कुमारजी, केंद्रीय अध्यक्ष, विश्व हिंदू परिषद; मायाताई ईवनाते, सांसद, राज्यसभा; पंकजाताई मुंडे, मंत्री, पशुसंवर्धन एवं पर्यावरण; आशिष जयस्वाल, राज्यमंत्री, कृषि, वित्त एवं नियोजन, मदत व पुनर्वसन, विधि एवं न्याय तथा कामगार; दिनेशचंद्रजी, केंद्रीय गो-रक्षा प्रमुख, विश्व हिंदू परिषद तथा शेखरजी मुंधडा, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य गो-सेवा आयोग की प्रमुख उपस्थिति रहेगी।

श्रद्धेय अशोकजी सिंघल जी के गोसेवा, गो-संरक्षण और समाजहित के प्रति समर्पित विचारों को स्मरण करते हुए आयोजित यह समारोह उनके जन्मशताब्दी वर्ष के शुभारंभ का महत्वपूर्ण अवसर होगा। गो-विज्ञान अनुसंधान केंद्र का उद्देश्य परंपरागत ज्ञान को वैज्ञानिक अनुसंधान से जोड़ते हुए गोवंश को ग्रामीण अर्थव्यवस्था, प्राकृतिक कृषि, स्वास्थ्य, ऊर्जा और रोजगार से जोड़कर आत्मनिर्भरता की दिशा में नए अवसर सृजित करना है।

कार्यक्रम का आयोजन बुधवार, ७ अक्टूबर २०२६ को प्रातः ९.३० बजे से दोपहर १.३० बजे तक गो-विज्ञान अनुसंधान केंद्र, गौतीर्थ, देवलापार में किया जाएगा।

थोडक्यात

### नागपूरचे मनोज कावलकर यांनी आयसीआयच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली

#### आयसीआय नागपूर केंद्राला राष्ट्रीय स्तरावर तीन पदे भूषविण्याचा मान




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरचे अभियंता मनोज कावलकर यांची इंडियन कॉंक्रिट इंन्स्टिट्यूट (आयसीआय) च्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली असून आयसीआयच्या इतिहासातील ते सर्वात तरुण अध्यक्ष ठरले आहेत. नागपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या एशियन सिनारिओ ऑन इन्फ्रास्ट्रक्चरल डेव्लहपमेंट या आंतरराष्ट्रीय परिषदेदरम्यान कावलकर यांनी २०२६-२८ या कालावधीसाठी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. १९८२ मध्ये संस्थेची स्थापना झाल्यापासून राष्ट्रीय अध्यक्षपद भूषविणारे ते २२ वे व्यक्ती आहेत. आयसीआय नागपूर केंद्रासाठी आणखी एक अभिमानाची बाब म्हणजे या केंद्रातील आणखी दोन प्रमुख सदस्यांनी संस्थेच्या राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाची पदे भूषविण्याचा मान मिळाला आहे. यात आयसीआय नागपूर केंद्राचे ज्येष्ठ सदस्य आणि प्रसिद्ध स्ट्रक्चरल कन्सल्टंट डॉ. एच. डी. चांदेवार यांची आयसीआयच्या उपाध्यक्ष (पश्चिम) पदी नियुक्ती करण्यात आली असून अभियंता अरुण उत्तरवार यांची आयसीआयच्या गव्हर्निंग कौन्सिल सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याप्रसंगी आयसीआय नागपूर केंद्रातर्फे आयसीआयच्या मुख्य कार्यालयाला धनादेश प्रदान करण्यात आला.

आयसीआय नागपूर केंद्रातील तीन सदस्यांना राष्ट्रीय नेतृत्वात स्थान मिळाल्याबद्दल आम्हाला आनंद झाला असून नव्या राष्ट्रीय नेतृत्वाला नागपूर केंद्राकडून पूर्ण सहकार्य देण्यात येईल तसेच आयसीआयच्या तांत्रिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक उपक्रमांमध्ये केंद्राचे योगदान यापुढेही सुरू राहील, असे आयसीआय नागपूर केंद्राचे अयक्ष डॉ. स्वप्नील साटोणे यांनी म्हटले आहे.

## पदवीधरांच्या प्रश्नांसाठी प्रा. अनिल सोले मैदानात

### नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या २०२६च्या निवडणुकीसाठी प्रा. अनिल सोले यांनी आज उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला. विभागीय आयुक्त कार्यालयात दुपारी १.३० वाजता त्यांनी आपला अर्ज सादर केला. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी प्रा. सोले यांनी मंदिरात जाऊन ईश्वराचे दर्शन घेतले. त्यानंतर समर्थकांच्या उपस्थितीत त्यांनी विभागीय आयुक्त कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी सुनील अग्रवाल, प्रकाश लोणारे, विलास त्रिवेदी आणि बाळासाहेब कुलकर्णी, अॅड. लांजेवार, डॉ. सत्यवान मेश्राम, प्रतीक घोडे आणि डॉ. श्याम पुंडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, समर्थक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना प्रा. सोले यांनी पत्रकारांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना उत्तरे देत नागपूर विभागाचा सर्वांगीण विकास आणि पदवीधरांच्या प्रश्नांबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. सुशिक्षित तरुणांसाठी रोजगाराच्या संधी, शिक्षण, कौशल्यविकास तसेच पदवीधरांच्या विविध प्रश्नांना प्राधान्य देण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. पदवीधरांच्या प्रश्नांना प्रभावी व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी आपण निवडणुकीच्या मैदानात उतरलो असल्याचे प्रा. सोले यांनी सांगितले. उमेदवारी अर्ज दाखल करताना मोठ्या संख्येने उपस्थित राहून पाठिंबा देणाऱ्या पदवीधर मतदार, पदाधिकारी, कार्यकर्ते, समर्थक आणि नागरिकांचे त्यांनी आभार मानले. पदवीधरांचा विश्वास आणि पाठिंबा हीच आपली खरी ताकद असून, त्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने प्रयत्न करण्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली. दशरथ मस्के, सुनील श्रीवास, दिलीप जाधव, सुरेश सवाई, दिपक अरोरा, राजु बाभरा, अडतानी, चंद्रकांत रोठे, जयंत आदमने, अनुप पाटील, सतीश यादव, सौ वंदना कोथळे, सौ. हनोटे यांची उपस्थिती होती.

### नागपूर विभाग पदवीधर निवडणूक : मतदानासाठी विशेष नैमित्तिक रजा, खासगी आस्थापनांतील कर्मचाऱ्यांना दोन तासांची सवलत

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी मतदार असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना मतदानाच्या दिवशी 'विशेष नैमित्तिक रजा' मंजूर करण्यात आली आहे. खासगी आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या पदवीधर मतदारांसाठी कामाच्या वेळेत दोन तासांची विशेष सवलत देण्याचे निर्देश प्रशासनाने दिले आहेत. भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार दि.२३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी आठ ते दुपारी चार वाजेपर्यंत मतदान व दि २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३५ ब नुसार पदवीधर मतदारांना मतदानासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येणार असून सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार या निवडणुकीत मतदार असलेल्या व्यक्तींना मतदानाच्या दिवशी विशेष नैमित्तिक रजा मिळणार आहे. ही रजा कर्मचाऱ्यांच्या अनुज्ञेय असलेल्या नैमित्तिक रजेव्यतिरिक्त असणार आहे.

## नागपूर पदवीधर निवडणूक स्थगित करावी, न्यायालयात जाण्याचा इशारा : प्रा. सचिन काळबांडे

### ९८,७८२ मतदारांचे अर्ज प्रलंबित असताना निवडणुकीची घाई कशासाठी? मतदार नोंदणी पूर्ण होईपर्यंत अंतिम यादी प्रसिद्ध करू नये, अशी मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत ६ ऑक्टोबर २०२६ रोजी असल्याचे निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे. मात्र, दुसरीकडे तब्बल ९८ हजार ७८२ मतदारांचे अर्ज विभागात प्रलंबित असून, त्यापैकी एकट्या नागपूर जिल्ह्यातील ६१ हजार ३७१ अर्ज प्रलंबित असल्याचा दावा करण्यात आला आहे. मतदार नोंदणीची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसताना अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याची घाई कशासाठी, असा सवाल उपस्थित करीत पदवीधर मतदारसंघाची निवडणूक स्थगित करण्याची मागणी प्रा. सचिन काळबांडे यांनी प्रशासन व निवडणूक आयोगाकडे केली आहे. मागणी मान्य न झाल्यास न्यायालयात जाण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

पदवीधर मतदारसंघासाठी मतदार नोंदणीची अंतिम मुदत २६ सप्टेंबर २०२६ होती.

२२ सप्टेंबर पर्यंत नागपूर विभागात १,९४,४०४ अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी १,५९,१९२ मतदारांची नोंदणी पूर्ण झाली होती. मात्र, शेवटच्या चार दिवसांत तब्बल ९८,७८२ अर्जांचा ओघ आला. ऑनलाइन नोंदणीसाठी केवळ दोन ठिकाणी लॉगिनची सुविधा उपलब्ध असल्याने अर्ज नोंदणीची प्रक्रिया मंदावली आणि मोठ्या संख्येने अर्ज ऑफलाइन व ऑनलाइन पद्धतीने प्रलंबित राहिले, असा आरोप प्रा. काळबांडे यांनी केला आहे.

५ सप्टेंबर २०२६ रोजी नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयातून मतदार नोंदणीची अंतिम यादी तयार करण्यासंदर्भात माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता, संबंधित अधिकाऱ्यांनी अद्याप अंतिम मतदार यादी तयार नसल्याचे सांगितले. तसेच अद्याप मतदार यादी पेंडिंगमध्ये असल्याचेही कळविण्यात आले, असा दावा त्यांनी केला.

दरम्यान, येत्या २३ ऑक्टोबर २०२६ रोजी निवडणुक असून , ५ ऑक्टोबर पर्यंत नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाने नोंदणी प्रक्रियेत ९८,७८२ अर्ज प्रलंबित ठेवले आहेत, अशी माहिती प्रा. काळबांडे यांनी दिली. अंतिम मतदार यादी अद्याप निश्चित नसताना निवडणुकीची प्रक्रिया अत्यंत घाईगडबडीने राबविली जात असल्याचे स्पष्ट दिसून येत असल्याचा आरोप त्यांनी केला. प्रशासन व निवडणूक आयोगाने एकाही पदवीधर मतदार आणि उमेदवारांना त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवू नये, अशी मागणीही त्यांनी केली.



एवढ्या मोठ्या प्रमाणात मतदार नोंदणीचे अर्ज प्रलंबित असताना निवडणूक प्रक्रिया पुढे नेण्यामागे नेमके कोणते राजकारण आहे, याची चौकशी होणे गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच सदर चुकीची पद्धत कोणाच्या इशाऱ्यावर राबविली जात आहे, याचा खुलासा करण्याची मागणीही त्यांनी केली. मतदारांना निवडणुकीची अंतिम उमेदवारी अर्ज भरण्याची तारीख येऊनही उमेदवार व मतदारांना त्यांच्या अधिकारांपासून वंचित ठेवण्याचे काम प्रशासन आणि निवडणूक आयोग करीत असल्याचा आरोप प्रा.काळबांडे यांनी केला. उमेदवारास एकूण किती मतदार राहतील, कोणत्या जिल्ह्यात किती मतदार नोंदणी झाली आहे, याची अंतिम माहितीच उपलब्ध नसताना निवडणूक घेणे योग्य आहे का, असा सवाल प्रा .सचिन काळबांडे यांनी पत्रकार परिषदेमध्ये उपस्थित केला.

## प्रा. अनिल सोले यांनी पद्मश्री डॉ. विलास डांगरे यांचे घेतले आशीर्वाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

चांगल्या कार्याची सुरुवात ज्येष्ठांचे आशीर्वाद घेऊन करण्याची परंपरा जपत नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या २०२६च्या निवडणुकीसाठी प्रा. अनिल सोले यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्यापूर्वी त्यांनी नागपूरचे ज्येष्ठ होमिओपॅथिक तज्ज्ञ, समाजसेवक आणि पद्मश्री पुरस्काराने सन्मानित डॉ. विलास डांगरे यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले.

ज्येष्ठांचा आशीर्वाद घेऊन पुढील कार्याची सुरुवात करण्याच्या उद्देशाने प्रा. सोले यांनी त्यांची भेट घेतली. त्यानंतर प्रा. अनिल सोले यांनी दुपारी १.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज सादर केला. यावेळी त्यांच्यासोबत समर्थक आणि सहकारी उपस्थित होते.



# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरीव मदत द्या!

## इंजि. सपना राजेंद्र मेश्राम यांचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन, सोयाबीन, कापूस व धानाला योग्य भाव देण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

उमरेड विधानसभा क्षेत्रासह नागपूर जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरीव आर्थिक मदत देण्यात यावी, तसेच शेतमालाला योग्य भाव मिळावा, अशी मागणी उमरेड विधानसभा संयोजक इंजि. सपना मेश्राम (शामटेके) यांनी केली आहे. याबाबत त्यांनी उमरेडचे उपविभागीय अधिकारी विद्यासागर चव्हाण यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांना निवेदन सादर केले.

महाराष्ट्राच्या मातीत धान्य पिकवून संपूर्ण राज्याचा अन्नदाता बनणारा शेतकरी सध्या अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहे. पावसातील मोठे खंड, प्रतिकूल हवामान, पाणीटंचाई तसेच नैसर्गिक संकटांमुळे कापूस, सोयाबीन, तूर, मूग, उडीद, मका, धान यासह अन्य पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला पीकहंगाम उद्ध्वस्त झाल्याने त्यांच्यावर कर्जफेडीचे व आगामी हंगामाचे मोठे संकट उभे ठाकले आहे.




ही केवळ शेतीची हानी नसून हजारो शेतकरी कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर झालेला मोठा आघात आहे. त्यामुळे शासनाने केवळ कागदोपत्री पंचनामे व कार्यवाही न करता प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन तातडीने मदत पोहोचवावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

**निवेदनातील प्रमुख मागण्या**

कोरडवाहू शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी १ लाख रुपये, हंगामी बागायतदारांना १ लाख ५० हजार रुपये आणि बारमाही बागायतदारांना २ लाख रुपये भरीव आर्थिक मदत देण्यात यावी. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीकविमा नुकसानभरपाई तातडीने मिळवून द्यावी. नादुरुस्त रोहित्रांची तातडीने दुरुस्ती करून शेतीसाठी सुरळीत वीजपुरवठा करण्यात यावा. आर्थिक संकटात असलेल्या शेतकरी व शेतमजुरांसाठी विशेष मदत जाहीर करावी. मध्यस्थ कंपन्या व इतर कर्ज संस्थांकडून शेतकऱ्यांची होणारी कथित फसवणूक रोखण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी. शेतमालाला योग्य व हमीभाव मिळणे हा शेतकऱ्यांचा हक्क असल्याने शासनाने त्यासाठी ठोस व्यवस्था करावी.

**सोयाबीनला १० हजार, कापसाला १२ हजार, धानाला ५ हजार भावाची मागणी**

नैसर्गिक संकटातून वाचलेला थोडाफार शेतमाल बाजारभावाच्या संकटामुळे पुन्हा आर्थिक अडचणीत सापडत आहे. उत्पादन खर्च वाढलेला असताना अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. त्यामुळे शासनाने संबंधित बाजार समित्यांना तातडीने आदेश देऊन शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दर मिळण्यासाठी ठोस व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनात सोयाबीनला १० हजार रुपये, कापसाला १२ हजार रुपये आणि धानाला ५ हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळणे ही केवळ आर्थिक मागणी नसून त्यांच्या कष्टाचा आणि घामाचा सन्मान आहे. बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होऊ नये, यासाठी शासनाने स्पष्ट व प्रभावी आदेश द्यावेत, अन्यथा आंदोलनाचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

थोडक्यात

## जैन मंदिर जवळील भागात बिबट्याने केली रानडुकराची शिकार



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

आज पहाटे चारच्या सुमारास रामटेक येथील जैन मंदिर जवळील झूडपी परिसरात बिबट्याने एका वजनदार रानडुकराची शिकार केली.या परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून बिबट्या आणि मोठ्या प्रमाणावर रानडुकरांचे वास्तव्य असून यापूवीर्ही बिबट्याने शिकारी केल्या आहेत. जवळच चारही बाजूला मानवी वस्ती, ग्रामीण भाग, अनेक लहान लहान खेडेगाव आहेत. जैन मंदिर परिसराच्या बाजूला मोठ्या प्रमाणावर मानवी वस्ती आहे. अशा वेळी प्रवाशी व स्थायी नागरिकांनी खबरदारी घेणे गरजेचे झाले आहे.

## रणबीर, साई पल्लवी ११ ऑक्टोबरला रामटेकमध्ये



**दै.सिंहवाणी वृत्त, रामटेक**

बहुचर्चित रामायण चित्रपटातील प्रभू श्रीरामाच्या भूमिका साकारणारा रणबीर कपूर आणि शेतीची भूमिका करणारी अभिनेत्री साई पल्लवी ११ ऑक्टोबरला रामटेक येथे प्रभू रामचंद्राच्या चरण स्पर्श पावन भूमी गडमंदिर येथे प्रभू रामचंद्रनाच्या दर्शना घेणार याशिवाय दिग्दर्शक नितेश तिवारी लक्ष्मणाची भूमिका साकारणार रवी दुबे ही येणार असल्याची माहिती वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी दिली रणबिर कपूर, साई पल्लवी, रवी दुबे दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या हस्ते रामायण चित्रपटातील एका गाण्याचे लोकार्पण रामटेक येथे केले जाणार आहे.

## एचआयव्ही जनजागृतीसाठी क्यूआर कोड स्कॅनरबाबत मार्गदर्शन




**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

विद्यासागर कला महाविद्यालय, खैरी येथे राष्ट्रीय सेवा योजना आणि रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने एचआयव्ही/एड्सविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने एचआयव्ही क्यूआर कोड स्कॅनर बाबत मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये एचआयव्हीविषयी शास्त्रीय माहिती, प्रतिबंधात्मक उपाय आणि जनजागृतीचे महत्त्व रुजविणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश सोमकुंवर, श्रीमतीअपर्णा हिंगणकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.सतीश महल्ले, डॉ. ज्योती कवठे, डॉ. रवींद्र पानतावणे मंचावर उपस्थित होते. यावेळी रामटेक येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या अपर्णा हिंगणकर यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्ही/एड्सविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी एचआयव्ही संसर्गाची कारणे, त्याचा प्रसार कशा प्रकारे होतो, संसर्ग टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी तसेच एचआयव्हीविषयी समाजात असलेल्या गैरसमजुती याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली.

यावेळी एचआयव्ही क्यूआर कोड स्कॅनरचा वापर कसा करावा, क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर एचआयव्ही विषयक माहिती कशी भरावी, याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना देण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून एचआयव्हीविषयी विश्वासार्ह माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविणे शक्य असल्याचे अपर्णा हिंगणकर यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्राचार्य डॉ. सुरेश सोमकुंवर यांनी एचआयव्ही/एड्सविषयी समाजात जनजागृती निर्माण करण्यामध्ये युवकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. एचआयव्हीग्रस्त व्यक्तींविषयी भेदभाव न करता त्यांना योग्य सामाजिक आधार देणे गरजेचे आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनातून एचआयव्हीविषयी माहिती समजून घेऊन ती समाजापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा.डॉ.सतीश महल्ले, आभार प्रा.डॉ.ज्योती कवठे यांनी केले. यावेळी डॉ. गिरीश सपाटे,डॉ.सावन धर्मपूरिवार, डॉ.रवींद्र पानतावणे, डॉ.विलास जायभाये,सर्व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## दारूच्या व्यसनावरून आई-वडिलांनीच केली मुलाची हत्या

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील तालुक्यातील गुणवडी शिवारातदारूच्या व्यसनावरून झालेल्या वादातून आई-वडिलांनी आपल्या मुलाला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. यात गंभीर जखमी होऊन उपचारांविना त्याचा मृत्यू झाला. प्रवीणला दारूचे व्यसन जडले होते. तो आई-वडिलांसोबतच राहत असल्याने दारूच्या कारणावरून त्यांच्यात वाद होत असत. काही दिवसांपूर्वी प्रवीण दारू पिऊन घरी आल्यानंतर झालेल्या वादातून वडिलांनी त्याला लाकडी दांडक्याने मारहाण केली. यामध्ये तो गंभीर जखमी झाला. मात्र, त्याला रुग्णालयात उपचारासाठी नेण्याऐवजी आई-वडिलांनी त्याला घरातच ठेवले. अखेर दोन दिवसांनी उपचारांविना त्याचा मृत्यू झाला.

# महावितरणच्या श्रीपाद काळे यांना ४ सुवर्णपदकांसह राज्यस्तरीय 'ऑलओव्हर चॅम्पियनशिप'!

### जलतरण स्पर्धेत कामगिरी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र राज्य जलतरण संघटनेच्या मान्यतेने जळगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात ३ आणि ४ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या २७ व्या राज्यस्तरीय मास्टर स्विमिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत महावितरणचे अधिकारी श्रीपाद काळे यांनी आपल्या अद्भूत व देदीप्यमान क्रीडा कौशल्याच्या जोरावर यशोशिखर गाठले आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या शेकडो नामांकित व कसलेल्या जलतरणपटूंना मागे टाकत त्यांनी स्पर्धेतील आपल्या सर्वच्या सर्व चारही आव्हानात्मक प्रकारांमध्ये




सुवर्णपदके जिंकून 'ऑलओव्हर चॅम्पियन ऑफ द टूर्नामेंट' हा सर्वोच्च बहुमान पटकावला. श्रीपाद काळे हे महावितरणच्या बुटीबोरी शहर शाखेचे सहायक अभियंता म्हणून कार्यरत आहेत. श्रीपाद काळे हे अभियंता असले तरी, खेळाच्या मैदानावर त्यांची कामगिरी एखाद्या व्यावसायिक जलतरणपट ूसारखीच प्रभावी असते. आपली शासकीय जबाबदारी समर्थपणे पार पाडत असतानाच, स्वतःच्या आवडीच्या क्षेत्रात सातत्याने सराव करून त्यांनी हे यश मिळवले आहे. केवळ या महोत्सवापुरतेच नव्हे, तर 'मास्टर्स' वयोगटातील जलतरण स्पर्धांमध्ये त्यांनी दीर्घकाळापासून आपला दबदबा कायम ठेवला आहे. त्यांच्या याच सातत्याचे फळ म्हणून त्यांना हे यश मिळाले आहे.

या दोन दिवशीय राज्यस्तरीय क्रीडा कुंभमेळ्याचे शानदार उद्घाटन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या शुभहस्ते आणि क्रीडा जगतातील मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. स्पर्धेच्या पहिल्या दिवसापासूनच श्रीपाद काळे यांनी जलतरण तलावात आपल्या उत्कृष्ट तंत्र, वेगाचे अचूक गणित आणि जबरदस्त स्टॅमिनाचा परिचय देत एकतर्फी वर्चस्व कायम राखले. त्यांनी १०० मीटर बॅकस्ट्रोक, ५० मीटर बॅकस्ट्रोक, २०० मीटर फ्रीस्टाईल आणि १०० मीटर फ्रीस्टाईल या चारही स्पर्धा प्रकारांत प्रथम स्थान मिळवत तब्बल चार सुवर्णपदकांची मालिका रचली. या निर्भेळ आणि ऐतिहासिक यशाबद्दल त्यांना मंत्री गुलाबराव पाटील आणि जलतरण संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते स्पर्धेची मुख्य 'ऑलओव्हर चॅम्पियनशिप ट्रॉफी' प्रदान करून विशेष सन्मानित करण्यात आले. महावितरणमध्ये सेवा बजावतानाच सराव आणि अखंड जिद्दीच्या जोरावर श्रीपाद काळे यांनी मिळवलेल्या या यशाचे क्रीडा क्षेत्रासह सर्वत्र कौतुक होत आहे.

# आयुर्वेद दिनानिमित्त भव्य मॅराथॉन

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

पिपळा (के) येथे भव्य मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन केवलराम पिपळा, तह. नरखेड, जि. नागपूर येथे आयुर्वेद दिनानिमित्त भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. मॅराथॉन स्पर्धेचे उद्घाटन सरपंच दिलिपरावजी चांदुरकर यांचे हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला उपसरपंच तांदुळकरजी,



ग्रामपंचायत येथील सदस्य तसेच ज्येष्ठ नागरिक, जिल्हा परिषद शाळा व गोमुख विद्यालय येथील मुख्याध्यापक आर. झेड. चवडे, शिक्षक वृंद व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. मॅरेथॉन स्पर्धा उत्साहाने पार पडली. स्पर्धेमधील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

"सेवा संकल्प अभियान" अंतर्गत गोमूख विद्यालय के. पिपळा येथील विद्यार्थ्यांना वैद्यकीय अधिकारी डॉ. म्रिनल पद्मगिरीवार यांनी आयुर्वेदीक आहार,विहार व योगा बाबत मार्गदर्शन केले. तसेच ओपीडी मधील रुग्णांची NCD SCREENING करण्यात आली. व पंचकर्म सेवा देण्यात आले. गोमुख विद्यालय येथील मुख्याध्यापक चवडे सर यांनी सर्व विद्यार्थ्यांना बदलत्या जीवनशैलीमध्ये आयुर्वेदाचे महत्त्व पटवून दिले. तसेच अध्यक्षिय भाषणामध्ये सरपंच यांनी आयुर्वेदाचे महत्त्व समजावून सांगीतले शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा आज राज्यव्यापी लाक्षणिक संप

**मुंबई :** अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाच्या वतीने ६ ऑक्टोबर रोजी राज्यव्यापी एकदिवसीय लाक्षणिक संप पुकारण्यात आला आहे. मुंबईतील आझाद मैदानावर दुपारी २ वाजता अंगणवाडी कर्मचारी शक्तिप्रदर्शन आणि जेल भरो आंदोलन करणार असल्याची माहिती संघटनेचे चिटणीस राजेश सिंह यांनी आहे. राज्यात एकात्मिक बालविकास सेवा योजनेत सुमारे १ लाख १० हजार ६६४ अंगणवाडी केंद्रात सुमारे २ लाख अंगणवाडी कर्मचारी कार्यरत आहेत. एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या माध्यमातून दरदिवशी ६ महिने ते ६ वर्षे बालकांना पूरक पोषण आहार, अनौपचारिक शिक्षण, तसेच गरोदर व स्तनदा मातांना आहार व आरोग्य सेवेचे फायदे देण्याचे महत्वाचे काम अंगणवाडी कर्मचाऱ्यांकडून केले जात आहे.

त्याव्यतिरिक्त अंगणवाडी कर्मचा-यांना निवडणूक संबधी, मातृवंदना योजना, लेक लाडकी योजना, लाडकी बहिण योजना, घरकुल योजना, दिव्यांग बालकांचे सर्वेक्षण इत्यादी योजनाबाहय कामे दिली जातात. गेल्या ५१ वर्षापासून तळागाळातील लाभार्थ्यांना सेवेचे फायदे देण्याचे अविरत कार्य अंगणवाडी कर्मचारी करीत आहेत. दरदिवशी ८ ते १० तास काम करूनसुध्दा, शासन त्यांना शासकीय कर्मचारी समजत नाही. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावे, अशी मागणी संघटनेकडून करण्यात आली. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दरमहा पेन्शन आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ग्रॅच्युइटीचा लाभ देण्यात यावा. या मागणीसंदर्भात मुख्यमंत्री यांच्यासोबत अनेक वेळा बैठका होऊनही सेवानिवृत्त अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या पेन्शन व ग्रॅच्युइटीबाबत शासनाने अद्याप ठोस आदेश काढले नाहीत.

## गोंदिया शिक्षक भरती प्रक्रियेत गैरप्रकाराच्या आरोपांनी खळबळ!

### पवित्र पोर्टल, माध्यम रोस्टरमधील कथित घोळाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर निलंबनाची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

गोंदिया जिल्हा परिषद अंतर्गत पवित्र पोर्टलद्वारे राबविण्यात आलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत गैरप्रकार, अनियमितता आणि माध्यम रोस्टरमध्ये घोळ झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करून दोषी शिक्षणाधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या प्रधान सचिवांकडे करण्यात आली आहे.

**हिंदी माध्यमाच्या उमेदवारांवर अन्याय झाल्याचा आरोप**

निवेदनात पवित्र पोर्टलच्या भरती प्रक्रियेदरम्यान हिंदी माध्यमाच्या पात्र उमेदवारांवर जाणीवपूर्वक अन्याय करून त्यांच्या हक्काच्या जागा हिरावून घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता पूर्ण न करणाऱ्या काही उमेदवारांना आर्थिक गैरव्यवहाराच्या माध्यमातून पात्र ठरवून नियुक्त्या देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

**माध्यम रोस्टरमध्ये घोळ झाल्याचा दावा**

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने बिंदूनामावली तयार करताना माध्यमांचा जाणीवपूर्वक गोंधळ केल्यामुळे अनेक पात्र व गरजू उमेदवार भरतीपासून वंचित राहिल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या संदर्भात यापूवीर्ही प्रशासनाला लेखी निवेदने देऊन माहिती देण्यात आली होती; मात्र अद्याप ठोस चौकशी अथवा कायदेशीर कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**दोषींवर कठोर कारवाईची मागणी**

निवेदनाद्वारे गोंदिया जिल्हा परिषदेतील संबंधित तत्कालीन व विद्यमान शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तसेच संबंधित कर्मचारी वर्गावर तातडीने निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच मंत्रालय स्तरावर सक्षम वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती करून संपूर्ण शिक्षक भरती प्रक्रिया आणि रोस्टरची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आहे.

हिंदी माध्यमाच्या अन्यायग्रस्त उमेदवारांना न्याय देऊन, अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या नियुक्त्या तात्काळ रद्द कराव्यात, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित हा गंभीर विषय असून, दोषींवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. हे निवेदन राजेश्वरी मानदास बसेंना, रा. काहली, ता. सालेकसा, जि. गोंदिया यांच्या वतीने सादर करण्यात आले आहे.

## महावितरणच्या 'सेवा सेतू' अभियानास आरईसी अधिकाऱ्यांची भेट, 'स्मार्ट' रूफटॉप योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहरातील वीज ग्राहकांच्या समस्यांचे जागेवरच निवारण करणाऱ्या महावितरणच्या विशेष 'सेवा सेतू' आणि 'सेवा संकल्प' अभियानाला नागरिकांचा अभूतपूर्व आणि उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. महावितरणच्या या अत्यंत यशस्वी उपक्रमाची पाहणी करण्यासाठी तसेच 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट) योजने'च्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी 'आरईसी' चे वरिष्ठ अधिकारी अक्षय साळी यांनी नागपुरातील विविध सेवा सेतू शिबिरांना विशेष भेट दिली. आपल्या या व्यापक पाहणी दौऱ्यादरम्यान अक्षय साळी यांनी शहरातील त्रिमूर्ती नगर चौक, दाभा चौक, नागपूर तहसील



कार्यालय परिसर आणि डीप्टी सिग्नल या चार प्रमुख ठिकाणी आयोजित शिबिरांचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. यावेळी त्यांनी तेथील प्रशासकीय कामकाज, ग्राहकांच्या तक्रार निवारणाचा वेग आणि केंद्र व राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा सर्वसामान्यांना प्रत्यक्ष मिळणारा लाभ या सर्व बाबींचा सविस्तर आढावा घेतला.

शिबिरांच्या ठिकाणी भेट देताना अक्षय साळी यांनी उपस्थित वीज ग्राहकांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या व मिळणाऱ्या सेवांबाबत थेट अभिप्राय जाणून घेतले. 'सेवा सेतू' अभियानांतर्गत वीज बिलांमधील दुरुस्ती, नवीन वीज जोडणी, नाव बदल, तसेच स्मार्ट मीटर आणि सौर ऊर्जा योजनांसंदर्भात येणाऱ्या अर्जांवर तातडीने कार्यवाही करून त्यांचा वेळेत निपटारा केला जात असल्याचे पाहून त्यांनी अत्यंत समाधान व्यक्त केले.

'स्मार्ट' आणि सौर ऊर्जा योजनांची अंमलबजावणी अधिक वेगाने, पारदर्शकतेने आणि सुलभतेने व्हावी, यासाठी त्यांनी क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना अधिक प्रोत्साहन देत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. "महावितरणतर्फे राबविण्यात येत असलेले सेवा सेतू अभियान हे ग्राहक केंद्रित प्रशासनाचा आणि गतिमान ग्राहकसेवेचा एक उत्तम वस्तुपाठ आहे. यामुळे सर्वसामान्य वीज ग्राहकांचे प्रश्न आणि समस्या जागेवरच सुटून प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होत आहे," असल्याची भावना. अक्षय साळी यांनी व्यक्त केली. या प्रसंगी महावितरणच्या नागपूर शहर मंडळाच्या कार्यकारी अभियंता (प्रशासन) प्रीती फुले यांच्यासह स्थानिक वरिष्ठ अधिकारी, अभियंता आणि कर्मचारी उपस्थित होते.

# न्यायालयाचा निकाल व घराचा ताबा मिळूनही छळ सुरूच, आमगाव पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

### दीपक पुरोहित यांचा पत्रकार परिषदेत गंभीर आरोप, पोलिसांसमोरच मारहाण व दमदाटी झाल्याचा दावा

**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

वरिष्ठ दिवाणी न्यायालयाच्या निकालानंतर न्यायालयीन प्रक्रियेतून आपल्या घराचा ताबा मिळूनही आपल्याला सातत्याने मानसिक व शारीरिक त्रास दिला जात असल्याचा गंभीर आरोप शास्त्री वार्ड, गोंदिया येथील दीपक राजकुमार पुरोहित यांनी केला आहे. या प्रकरणी आमगाव पोलिसांच्या भूमिकेवरही त्यांनी पत्रकार परिषदेत प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, पोलिसांच्या उपस्थितीतच शिवीगाळ, मारहाण व दमदाटी झाल्याचा दावा केला आहे.

दीपक पुरोहित यांनी आमगाव येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिलेल्या माहितीनुसार, मौजा रिसामा, ता. आमगाव येथील घराच्या ताब्यासंदर्भात त्यांनी



वरिष्ठ दिवाणी न्यायालय, गोंदिया येथे दिवाणी खटला दाखल केला होता. न्यायालयाने २५ ऑगस्ट २०२६ रोजी त्यांच्या बाजूने निकाल दिल्यानंतर न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या तसेच आमगाव पोलिसांच्या उपस्थितीत संबंधित घराचा ताबा त्यांना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

मात्र, घराचा ताबा मिळाल्यानंतरही गैर-अर्जदार शोभा रमेश डोये, रा. रिसामा यांच्याकडून वारंवार त्रास दिला जात असल्याचा आरोप पुरोहित यांनी केला. घरात जबरदस्तीने प्रवेश करण्याचा प्रयत्न, शिवीगाळ करणे तसेच खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी दिली जात असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

**गणेश चतुर्थीच्या दिवशी वाद झाल्याचा आरोप**

१४ सप्टेंबर २०२६ रोजी गणेश चतुर्थीच्या दिवशी संबंधित महिलेने नवीन घराच्या प्रवेशद्वारासमोर गणेशाची मूर्ती ठेवून वाद निर्माण केल्याचा आरोप पुरोहित यांनी केला. यावेळी विरोध करणारे कामगार अमित करंडे तसेच स्वतः पुरोहित यांना धमकावण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या घटनेनंतर आमगाव पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली. त्यानंतर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. मात्र, पोलिसांसमोरच संबंधित महिलेने पुन्हा शिवीगाळ व मारहाण केल्याचा दावा पुरोहित यांनी केला आहे.

**पोलिसांसमोर घटना घडूनही कारवाई नाही**

या संपूर्ण प्रकाराचे व्हिडिओ पुरावे पोलिसांना दाखविण्यात आले असल्याचे सांगत, त्यानंतरही अपेक्षित कायदेशीर कारवाई करण्यात आली नसल्याचा आरोप पुरोहित यांनी केला. 'ती महिला आहे, आम्ही काय करू शकतो?' अशा आशयाची भूमिका पोलिसांकडून घेण्यात आल्याचा दावाही त्यांनी पत्रकार परिषदेत केला.

पोलिसांसमोरच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असताना कारवाई न झाल्यामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीबाबत संशय निर्माण होत असल्याचे पुरोहित यांनी म्हटले आहे. संबंधित प्रकरणात उपलब्ध व्हिडिओ पुरावे, न्यायालयाचा निकाल आणि घराचा ताबा देण्यात आल्याची प्रक्रिया यांची दखल घेऊन पोलिसांनी निष्पक्षपणे चौकशी करून कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

**कारवाई न झाल्यास पुन्हा न्यायालयात जाणार**

न्यायालयाच्या आदेशानंतर घराचा ताबा मिळाल्यानंतरही जर अशा प्रकारे त्रास सुरू राहणार असेल, तर कायदेशीर संरक्षणाचा प्रश्न निर्माण होत असल्याचे पुरोहित यांनी सांगितले. संबंधित व्यक्तीविरुद्ध तातडीने कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात यावी; अन्यथा न्याय मिळविण्यासाठी पुन्हा न्यायालयाचे दरवाजे ठोठावावे लागतील, असा इशारा त्यांनी पत्रकार परिषदेत दिला. सदर प्रकरणी तक्रार प्राप्त झाली त्यावरून, आरोपी महिलेवर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आले आहे, तसेच पुढे तपास सुरु आहे, असे पोलीस निरीक्षक,आमगाव नीलकंठ कुकडे यांनी सांगितले.

थोडक्यात

## आई जगदंबा गणेश उत्सव मंडळाकडून श्रीवासनगर महादुला येथे भव्य रोगनिदान शिबिर आणि विविध योजना शिबिर संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी - मिलिंद गाडेकर**

रविवार सकाळी ९ते २ वाजता पर्यंत आशा मल्टी स्पेशालिटी कामठी आणि गुमथी प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या डॉ. टीम यांच्या सहयोगाने आई जगदंबा गणेश उत्सव मंडळ, श्रीवासनगर महादुला येथे भव्य रोगनिदान शिबिर संपन्न झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन ना चंद्रशेखर बावनकुळे मंत्रीमहोदय यांनी केले, तर प्रमुख उपस्थिती महादुला नगरपंचायतच्या अध्यक्षा हेमलता मनोज सावजी, उपाध्यक्ष वैशाली पखीडे आणि सगळे नगरसेवक याप्रसंगी उपस्थित होते.

मोफत आरोग्य शिबिरात रक्तदान शिबिर, हार्ट रोग, श्वसन रोग, मेंदू संबंधित विकार, पोटाचे आजार, नाक कान घसा, वायरल डिसिज, इत्यादी रुग्णांची तपासणी करण्यात आली काही हार्ट पेशंट, मेंदूज्वर रुग्णांना विशेषज्ञ डॉक्टरकडे रेफर करण्यात आले. त्यांना तस्संमरोगाबाबतची औषधे मोफत देण्यात आली. याव्यतिरिक्त रक्तदान शिबिरचे देखील आयोजन केलेले होते बहुसंख्य नवतरुण आणि प्रसिद्ध उद्योजक मनोज सावजी यांनी देखील रक्तदान केले, भाजप गटनेते अभिजित ढेंगरे, जितू भगत, दीपक जैन, पवन पाखिड्डे, अमोल कुथे भाजयुमो अध्यक्ष महादुला नगर, रोहनकर, नरेंद्र धनुले माजी सरपंच कोराडी यांचेसह ४२ युवकांनी रक्तदान केले. या कार्यक्रमानंतर दिवसभर मतदान नोंदणी, सह आयुष्यमान कार्ड, एस टी जेष्ठ नागरिक कार्ड, महात्मा फुले आरोग्य योजना कार्ड, दिव्यांग नोंदणी करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आई जगदंबा गणेश उत्सव मंडळाचे सहकार्य लाभले.

## ज्ञानेश कुमार निलंबन प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश देण्यास नकार



**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने आज (दि. ५ ऑक्टोबर) मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना निलंबित करणाऱ्या याचिकेवर अंतरिम आदेश देण्यास नकार दिला. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी निवडणूक आयोगाला तसेच मुख्य निवडणूक आयुक्तांसोबत इतर दोन निवडणूक आयुक्तांना नोटिस पाठवली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील बेंचने या प्रकरणी सुनावणी करताना मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयोगावर झालेल्या आरोपांवर स्पष्टीकरण मागितले आहे. न्यायालयाने आम्ही आधी निवडणूक आयोगाने याबाबत सर्व नियमांचे पालन झाले आहे का नाही त्याची तपासणी करणार. जर कोणता निर्णय घेताना कायद्याचे पालन झालेलं नाही असं आढळले तर तो निर्णय रद्द करता येईल.

सूर्यकांत म्हणाले की, आम्ही फॉर्म ६ मध्ये कोणतेही मॉडिफिकेशन करण्याची परवानगी दिली नव्हती हे आधी स्पष्ट करतो. ज्यावेळी रेकॉर्ड सादर केले जातील. त्यावेळी आम्ही त्यात मॉडिफिकेशन कोणी केले हे पाहू. तुमची याचिका घाई गडबडीत केली असल्याचे दिसत आहे. न्यायालयाने प्रतीवाद्यांना तुमच्या आरोपांना स्पष्टपणे आणि पारदर्शक उत्तर द्या असे देखील आदेश दिले आहेत. या प्रकरणी प्रतीवाद्यांना देखील नोटीस बजावण्यात आली आहे. सिंग यांनी कुमार यांचे या याचिकेवर अंतिम सुनावणी होत नाही तोपर्यंत निलंबन करा अशी मागणी केली आहे. त्यांनी निवडणूक आयोगाचे बहु सदस्यत्व टिकवण्यासाठी त्यांना निलंबित करावे अशी मागणी याचिकेद्वारे केली होती. याचिकाकर्त्यानें संधू आणि जोशी हे या काळात निवडणूक आयोगाचा कार्यभार संयुक्तरित्या सांभाळतील. तो दोघं सहमत होतील तोच निर्णय घेतला जाईल. आणि मुख्य निवडणूक आयुक्तांची जागा ही ज्या समितीत सीजेआयचा समावेश आहे त्या समितीने करावी.

## विद्यार्थ्यांच्या हक्कांवर मध्यरात्री पोलिस बळाचा घाव

**मुंबई :** आपल्या न्याय्य आणि घटनादत्त हक्कांसाठी नाशिक ते मुंबई असा शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास करून आलेल्या गरीब आदिवासी विद्यार्थ्यांशी संवादाची भाषा करण्याऐवजी सरकार पोलीस बळाचा वापर करून त्यांना बेड्या ठोकत आहे. महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे मुख्यालय असलेल्या दादर येथील टिळक भवनमध्ये आश्रयाला थांबलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांवर मध्यरात्री झालेल्या कथित बेकायदेशीर पोलीस कारवाईवरून थोरात यांनी महायुती सरकारच्या कारभाराचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे.

मध्यरात्री घडलेल्या घटनेवर तीव्र संताप व्यक्त करताना बाळासाहेब थोरात म्हणाले, आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी नाशिकहून पायी मुंबईत दाखल झालेले आदिवासी विद्यार्थी मुक्कामासाठी सुरक्षित जागा म्हणून टिळक भवनात विश्वासाने थांबले होते. मात्र, मध्यरात्री पोलिसांनी बेकायदेशीररीत्या काँग्रेसच्या प्रदेश मुख्यालयात घुसून विद्यार्थ्यांवर दबाव आणला. त्यांना धमकावून, बळाचा वापर करत चुकीच्या पद्धतीने ताब्यात घेण्यात आले. हे कृत्य लोकशाही मूल्यांची पायमल्ली करणारे आहे. शांततेच्या आणि सनदशीर मार्गाने आंदोलन करणाऱ्या या आदिवासी तरुण-तरुणींशी सरकारने सन्मानाने संवाद साधायला हवा होता. त्यांच्या शैक्षणिक, वसतिगृह किंवा इतर मूलभूत समस्या समजून घेऊन त्या सोडवणे हे कल्याणकारी राज्याचे कर्तव्य आहे. मात्र, सरकारने समस्या ऐकण्याऐवजी लाठी आणि खाकीचा धाक दाखवून आवाज दडपण्याचा प्रयत्न केला.

# महायुतीचे उमेदवार सुधाकर कोहळे यांचा विजय निश्चित

## गेल्यावेळची कसर यावेळी भरून काढणार, दुष्काळाची परिस्थिती गंभीर, आदिवासी विद्यार्थ्यांचे आंदोलन लोकशाही मार्गाने व्हावे : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर पदवीधर मतदारसंघातून महायुतीचे अधिकृत उमेदवार सुधाकर कोहळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. गेल्यावेळी ही जागा आम्ही जिंकू शकलो नव्हतो. मात्र यावेळी महायुतीचे सर्व घटक पक्ष, कार्यकर्ते आणि पदाधिकारी एकजुटीने काम करत आहेत. त्यामुळे यावेळी कोहळे यांचा प्रचंड बहुमताने विजय होईल, असा विश्वास महसूलमंत्री तथा नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर विमानतळावर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना विविध विषयांवर भूमिका स्पष्ट केली.



**अनिल सोले यांची नाराजी दूर करू**

अनिल सोले नाराज असले तरी त्यांची नाराजी काही काळापुरती असू शकते. त्यांच्याशी निश्चितपणे चर्चा करून त्यांची नाराजी दूर केली जाईल. ते आपला उमेदवारी अर्ज मागे घेतील, असा विश्वासही बावनकुळे यांनी व्यक्त केला.

**अमरावतीच्या जागेबाबत महायुतीत चर्चा**

अमरावती विधानपरिषद मतदारसंघाबाबत महायुतीच्या बैठकीत चर्चा झाली आहे. ही जागा शिवसेनेने लढवावी, असा विचार बैठकीत मांडण्यात आला आहे. मात्र याबाबतचा अंतिम निर्णय आणि अधिकृत घोषणा प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण तसेच महायुतीतील संबंधित पक्षांचे अध्यक्ष संयुक्तपणे करतील, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

**दुष्काळाची परिस्थिती गंभीर**

राज्यातील दुष्काळी परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. सोयाबीन आणि कापसाचे मोठे नुकसान झाले असून मक्याचेही नुकसान झाले आहे. रब्बीचे पीक घेणेही अवघड होण्याची शक्यता आहे. पुढील काळात चारा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना मदत देण्याच्या दृष्टीने विचार सुरू केला आहे. पीक विमा तसेच एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या माध्यमातून मिळणारी संपूर्ण मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

**चारा टंचाईवर वैरण विकासाचा उपाय**

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चारा टंचाईचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी नियोजन करण्यात येत आहे. ज्या ठिकाणी थोडा ओलावा उपलब्ध आहे, त्या ठिकाणी 'माता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजने'अंतर्गत चारा लागवडीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. वैरण विकासाची कामे हाती घेण्यात आली आहेत.

विदर्भात मोठ्या प्रमाणावर वनक्षेत्र आहे. या भागात बी-बियाणे उपलब्ध करून देऊन चारा निर्मिती करता येऊ शकते. यासाठी वन विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली असून आवश्यक निधी उपलब्ध करून देत वनक्षेत्रातूनही चारा उपलब्ध करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

**शेतकऱ्यांसोबत झुणका-भाकर, ठेच्याचा अनपेक्षित बेत**

शेतकऱ्यांसोबत केलेल्या जेवणाबाबत बावनकुळे म्हणाले की, हा कोणताही पूर्वनियोजित कार्यक्रम नव्हता. शेतकरी डबा घेऊन आले होते. आपण त्यांच्या भेटीसाठी गेल्यानंतर त्यांनी प्रेमाने डबा खाण्याची विनंती केली. त्यानंतर शेतकऱ्यांसोबत झुणका-भाकर आणि ठेचा खाल्ला. दुष्काळाच्या संकटात शेतकरी दुःखी असला तरी त्याने आपले संस्कार आणि पाहुणचाराची परंपरा विसरलेली नाही, हे या प्रसंगातून दिसून आले, असे बावनकुळे म्हणाले.

**तांदूळ घोटाळ्याच्या चौकशी अहवालानंतर कारवाई**

तांदूळ घोटाळ्याच्या चौकशीत कोणी दोषी आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई केली जाईल. चौकशीचा अहवाल काय येतो, त्यावर पुढील निर्णय अवलंबून असेल. चौकशी गंभीर स्वरूपाची असल्यास फौजदारी गुन्हेही दाखल केले जाऊ शकतात, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

**पत्रकारांना ट्रोल करणे, मारहाण करणे अयोग्य**

महिला संपादकाला करण्यात आलेल्या ट्रोलिंगबाबत बावनकुळे यांनी नाराजी व्यक्त केली. महाराष्ट्राची संस्कृती आणि संस्कार जपले पाहिजेत. महिला संपादकाला अशा पद्धतीने वागणूक देण्याची परंपरा महाराष्ट्राची नाही. ट्रोल करणाऱ्या व्यक्तींचा पोलिसांकडून शोध घेऊन कारवाई केली जाईल. गरज पडल्यास आपणही पोलिसांशी याबाबत चर्चा करू, असे त्यांनी सांगितले. पत्रकारांना मारहाण करणे किंवा ट्रोल करणे योग्य नाही. पोलिसांनी या प्रकरणात कठोर भूमिका घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**आदिवासी विद्यार्थ्यांचे आंदोलन लोकशाही मार्गाने व्हावे**

आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत बावनकुळे म्हणाले की, आंदोलन करण्याचा अधिकार सर्वांना आहे; मात्र आंदोलन लोकशाही पद्धतीने झाले पाहिजे. सरकारी मालमत्तेचे किंवा समाजाचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. आंदोलन आक्रमक असले तरी तोडफोड करणे योग्य नाही. आंदोलन कसे करावे, याचे भान आंदोलकांनी ठेवले पाहिजे.

**शहरनिहाय पाणी नियोजन; पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य**

पाणीटंचाईच्या संभाव्य परिस्थितीवर सरकारकडून नियोजन सुरू आहे. प्रत्येक शहराचे पाणी उपलब्धता आणि गरज याचे आकलन करण्यात आले असून त्यानुसार एसओपी तयार केली जात आहे. त्यानुसारच पाणी सोडण्याचे नियोजन केले जाईल. पाण्याच्या वापरामध्ये सर्वप्रथम पिण्याच्या पाण्याला प्राधान्य दिले जाईल, असे बावनकुळे यांनी सांगितले.

**महायुतीत चर्चेतून जागावाटपाचा मार्ग**

शिंदे यांच्या दिल्ली दौऱ्याबाबत विचारले असता बावनकुळे म्हणाले की, महायुतीमध्ये जागावाटपाबाबत सकारात्मक चर्चा सुरू आहे. कधी एखाद्या पक्षाला आघाडी मिळते, तर कधी दुसऱ्या पक्षाला; मात्र महायुतीमध्ये चर्चेतून निर्णय घेतले जातात. ज्या जागा ज्या पक्षाकडे विद्यमान आहेत, त्या सिटिंग-गेटिंगच्या आधारावर लढविण्याचा प्राथमिक विचार आहे. त्यानंतर उर्वरित जागांबाबत सामंजस्याने निर्णय घेतला जाईल.

**बंडखोरीवर माघारीच्या अंतिम दिवसापर्यंत चर्चा**

निवडणुकीत काही जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले तरी माघारीच्या अंतिम दिवसापर्यंत परिस्थिती बदलू शकते. बंडखोरी झालेल्या ठिकाणी संबंधित उमेदवारांशी चर्चा करून त्यांना उमेदवारी अर्ज मागे घेण्यास प्रवृत्त करण्याचे प्रयत्न केले जातील, असे बावनकुळे यांनी सांगितले.

**मुंबई विमानतळाच्या धावपट्टीच्या दुरुस्तीवर आरोप-प्रत्यारोप नको**

मुंबई विमानतळाच्या धावपट्टीबाबत विचारले असता बावनकुळे म्हणाले की, धावपट्टीमध्ये काही समस्या निर्माण झाली असेल किंवा भविष्यात त्यातून मोठी अडचण निर्माण होण्याची शक्यता असेल तर तिची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. अशा विषयावर आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती दुरुस्ती करणे महत्त्वाचे आहे.

## इंडिया आघाडीचा आज निवडणूक आयोगाला घेराव

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

एसआयआरबाबत सुरू असलेल्या विरोधादरम्यान १९ विरोधी पक्षांचे नेते मंगळवार दि. ६ ऑक्टोबर रोजी दिल्लीत निवडणूक आयोगाला घेराव घालणार आहेत. इंडिया आघाडीचे विरोधी खासदार दिल्लीत लोकशाही वाचवा मार्च काढणार आहेत. ते संसद भवनापासून निवडणूक आयोगाच्या मुख्यालयापर्यंत सुमारे ३ किमी पायी चालत जाणार आहेत.



विरोधी आघाडीने ३० सप्टेंबर रोजी दिल्लीतील कॉन्स्टिटयूशन क्लबमध्ये झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेतला होता. सुमारे ३ तास चाललेल्या बैठकीत ३ मुद्यांवर सहमती झाली होती. पहिला मुद्दा मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना हटवण्यासाठी संसदेत प्रस्ताव आणावा. दुसरा मतदार यादीतून वगळण्यात आलेली नावे सार्वजनिक करावीत. नावे वगळण्यापूर्वी मतदाराला नोटीस आणि अपील करण्याची संधी मिळावी आणि तिसरा ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेद्वारे निवडणुका घेण्यात याव्यात. यापूर्वी ११ ऑगस्ट २०२५ रोजी आघाडीच्या खासदारांनी संसद भवनापासून निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत मोर्चा काढला होता. यात राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे, शरद पवार यांच्यासह २५ विरोधी पक्ष सहभागी झाले होते.

**१९ पक्षांकडे लोकसभेत १७८ खासदार**

इंडिया ब्लॉकचे १९ पक्ष मोर्चा काढणार आहेत. त्यांच्याकडे लोकसभेत १७८ आणि राज्यसभेत ६२ खासदार आहेत. हे पक्ष आहेत काँग्रेस, समाजवादी पार्टी, टीएमसी, एनसीपी (एसपी), शिवसेना (यूबीटी), आरजेडी, सीपीएम, सीपीआय, एनसी, पीडीपी, जेएमएम, सीपीआय-एमएल, आययूएमएल, केसी (एम),एमडीएमके, व्हीसीके, आरएसपी, एआयएफबी आणि केसी (जे). यांचा समावेश आहे.

## १६ ऑक्टोबरपासून राज्यभरात पाणीकपात

**मुंबई :** अलनिनोच्या प्रभावामुळे यंदा राज्यातील पर्जन्यमानात मोठी घट झाली असून अनेक भागांत पाण्याची उपलब्धता मर्यादित झाली आहे. आगामी काळात पाणीटंचाईची तीव्रता वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्य सरकारने आतापासूनच पाण्याच्या वापरावर नियंत्रण आणण्यास सुरुवात केली असून राज्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कोणतीही टंचाई भासू नये, यासाठी पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. येत्या १६ ऑक्टोबरपासून सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये किमान १० टक्के पाणीकपात लागू करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती सोमवार दि. ५ ऑक्टोबर रोजी राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरण्याचे आवाहनही जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे. जलसंपदा, महसूल, कृषी, उद्योग आणि नगरविकास विभाग समन्वयाने काम करत असून पालकमंत्री तसेच कालवा सल्लागार समित्यांच्या माध्यमातून पाणीसाठ्याचा नियमित आढावा घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी जलसंपदा विभागाने ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंतचा धरणनिहाय आणि वापरनिहाय पाणीसाठा आराखडा तयार केला आहे.

## गांधीजी-शास्त्रीजींसारखे 'रिअल स्टार्स' फॉलो करा : कौस्तुभ पवार

### ब. रु. हायस्कूलमध्ये गांधी-शास्त्री जयंती साजरी

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

सोशल मीडियावरील 'रील स्टार्स'ना फॉलो करण्यापेक्षा राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांच्यासारख्या 'रिअल स्टार्स'ला फॉलो करा, त्यांचे विचार आत्मसात करा, असे आवाहन कौस्तुभ पवार यांनी विद्यार्थ्यांना केले. बनारसीदास रुईया हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, काटोल येथे महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.




कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना काळे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्याध्यापक हिरामण सोमकुवर पर्यवेक्षक अजय खडसे शिक्षक प्रतिनिधी भोजराजन चंदन ज्येष्ठ शिक्षिका राधा चव्हाण व हर्षाली थोटे, ज्येष्ठ शिक्षक तथा कवी सुरेश राठोड आदींची मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपाली तायडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा गांधी लालबहादूर शास्त्री यांच्या फोटोला सुताची माळ घालून दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर शाळेतील संगीत शिक्षिका लीना सावरकर यांनी आपल्या सुमधुर आवाजात "वैष्णव जन तो तेने कहिये जे पीड़ परायी जाणे रे" हे गाणे गायले. त्यांना तबल्यावर शाळेतील तबला शिक्षक भास्कर सिरसाट यांनी व हार्मोनियम वर पर्यवेक्षक अजय खडसे यांनी साथ दिली.

यानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शाळेतील शिक्षक कौस्तुभ पवार यांनी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकत सत्य, अहिंसा, साधेपणा, स्वावलंबन, काटकसर, स्वच्छता, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रसेवेचा गांधीजी व शास्त्रीजी यांनी दिलेला संदेश आजच्या काळातही समाजासाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी असल्याचे विद्यार्थ्यांना विविध उदाहरणातून समजवून सांगितले व दोन्ही नेत्यांचा जीवनपट मोजक्या पण प्रभावी शब्दात विद्यार्थ्यांसमोर मांडला. त्यानंतर शाळेतील ज्येष्ठ शिक्षक कवी सुरेश राठोड यांनी आपली "अजरामर झाले गांधी" ही स्वरचित कविता सादर करत विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. तर मुख्याध्यापिका वंदना काळे यांनी अध्यक्षीय भाषणात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवन कार्याचा थोडक्यात आढावा घेत त्यांच्यापासून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### एनसीसी कॅडेट्सनी राबविले स्वच्छता अभियान

राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधत बनारसीदास रुईया हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, काटोल येथील ४ महाराष्ट्र नेव्हल युनिटचे सेकंड ऑफिसर अमोल जवंजाळ तसेच २० महाराष्ट्र बटालियन युनिटचे सेकंड ऑफिसर फहीम शेख यांच्या मार्गदर्शनात शाळेतील एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी शालेय परिसरात स्वच्छता मोहीम राबवत गांधीजी व शास्त्रीजी या दोन्ही महान नेत्यांना जयंतीदिनी अनोखी आदरांजली वाहिली.

